MAHMAR 19358/13/1/2000-TC



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तेरावे / अंक १२ / डिसेंबर २०१२

## संपादकीय १

### दैवतीकरण - नाजूक विषय

आदिमानवाच्या काळापासूनचा ढोबळ विचार केला तर दैवतीकरण करण्याची माणसाची वृत्ती ठळकपणे लक्षात येईल. निसर्गातील वादळ, वारे, प्राणी इत्यादी घटकांच्या रौद्र रूपांमुळे माणसाच्या मुलभूत प्रवृत्तींपैकी भीती दृश्य रूपात व्यक्त झाली. या भीतीतूनच काळाच्या ओघात या घटकांना देवत्व बहाल करुन माणूस त्यांची पूजा करू लागला. एकूण विश्वाचा आवाका इतका प्रचंड आहे की या घटकांतील दैवतस्वरूप समजावे यासाठी माणूस सगुण रुपाची कल्पना करू लागला. सूर्य, चंद्र, झाडे, झुडपे, पशुपक्षी यांचे आकार किंवा त्यावरून बनलेले आकार हे पूजेचा विषय बनू लागले. दैवतीकरणाच्या या भावनिक गरजेतूनच आजचे देव उगम पावले. काही देव कल्पनेतून आले तर काही माणसांनी माणसांनाच देवत्व बहाल केले.

निसर्गाबरोबरच आपल्या शारीरिक शक्तीच्या जोरावर जरब निर्माण करण्याची कला साधलेली हाडामासाची माणसे इतर माणसांतील या भीतीचा वापर करून देव बनू लागली. यातूनच पुढे काळाच्या ओघात टोळ्या व टोळ्यांच्या 'म्होरक्या' या स्वरूपातले 'देव' घडत गेले आणि मग माणसाचेही दैवतीकरण घडून येऊ लागले. सर्व माणसे सारखी नसतात, तसे सर्व 'म्होरके' सारखे नसतात. त्यामुळे 'मला पहा आणि फुले वहा' अशी जुलमाच्या राजकारणाची खंडणी वसूल करणारे नेते काळाच्या ओघात दिसून येऊ लागले. त्यांच्या सर्व प्रकारच्या शक्ती पुढे भीतीतून वा भोळेपणातून त्यांचा अनुयय करणारे त्यांना शेंदूर लावले गेले. फुले वाहत गेले. ''मुकी बिचारी कुणी हाका...'' या सदरात गर्दी करू लागले. अर्थात हे सर्व अत्यंत थोडक्यात मांडले आहे. मानवी उत्क्रांतीच्या प्रत्येक टप्प्यावर दैवतीकरण कसे बदलते याबद्दल पुष्कळच तपशिलात विचार करता येण्यासारखा आहे.

स्वतःला मोठे समजणाऱ्या वा जनतेकडून जुलमाने नमस्कार करुन घेणाऱ्या नेत्यांचा आढळ सर्वच क्षेत्रांत होतो. व्यक्तीच्या स्वतःसिद्ध गुणांमुळे होणारे दैवतीकरण हा विषय वेगळा आहे. पण काळाची आपल्यावर सत्ता आहे. आपली काळावर नाही हे विसरून अमरपट्टा घेऊन आल्याप्रमाणे वागणारी काही नेते मंडळी हा दैवतीकरणाचा पुढचा आविष्कार असतो. आपण म्हणजे 'अवतार' आहोत अशा समजुतीत वावरणाऱ्या या नेत्यांचे तारतम्य संपले की 'जन पळभर म्हणतील हाय हाय...' हे सत्य त्यांना कळेनासे होते. या अति दैवती करणामुळे दैवतीकरण आणि त्याचा अतिरेक यांतील सीमारेषा पुसली जाते.

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

चमत्काराला नमस्कार करण्याची सामान्य माणसाची सवय असते. या सर्वातूनच आपल्या लौकिक जीवनात अर्थ शोधू पाहतो. एखाद्या मंदिरात जाऊन मनःशांतीचा ध्यास बाळगणारा सामान्य माणूस मंदिरातल्या मूर्तीत देव शोधतो. माणसांच्या दैवतीकरणाबाबतही त्याचे तसेच असते. हा 'देवासारखा' माणूस आपल्या विवंचना संपवेल, आपले जगणे सुसह्य करेल या भाबड्या आशेवर तो जगतो. पण या दैवतीकरणालाही सीमा असतात. कारण अनेक बिरूदानी ज्याचे नाव मोठे करण्याचा प्रयत्न समाज करतो, त्या माणसाचे पायही मातीचेच असतात.

आजच्या काळाच्या संदर्भात अधिकारांच्या खुर्च्या वापरत कुणाला कर्जे माफ कर, कुणाच्या तोंडाला आश्वासनाची पाने पूस असे करणारे तथाकथित नेते देव बनू पाहतात, पण काळ हे असे त्रिकालाबाधित सत्य आहे की तुम्ही जे करता ते येथेच भरावे लागते आणि काळाच्या स्वाधीन व्हावे लागते. माझ्याशिवाय जग कसे चालेल असे वाटणारे हे देव बोळवण केली की पाण्यात विरघळून जातात. उपरोक्त कवितेत भा. रा. तांबे म्हणतात, 'राम कृष्णही आले गेले, त्यावाचून का जग हे अडले...?' म्हणूनच स्वतःला देव समजणारांनी आपण मेलो तरी चंद्र सूर्य आकाशीच असणार आहेत हे ओळखून असावे. मरणाचे भान ठेवणारांनाच हा किती अनाकलनीय विषय आहे ते समजू शकेल.

**– मोहन पाठक**

## संपादकीय - २

महाराष्ट्रातील ताज्या घटना आणि गेल्या काही दशकांमध्ये विशेषतः राजकीय पुढाऱ्यांचे झालेले आणि चालू असलेले दैवतीकरण ही एक गंभीर बाब आहे. अशा दैवतीकरणाला साहित्यिक आणि विचारवंतांचा लागलेला हातभार हा तर अधिक गंभीर आहे. दैवतीकरण हे कमी अधिक प्रमाणात सर्वच सभ्यतांमध्ये आढळून येत असले तरी विसाव्या शतकातील उदाहरणे, चिकित्सक समाज आणि त्याच्या दिवाळखोर नेतृत्वाचा इतिहास आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून ते दुसऱ्या महायुद्धापर्यंत सर्व हुकूमशाही, एकाधिकारशाही देशांमध्ये योजनाबद्ध असे त्यांच्या नेतृत्वाचे दैवतीकरण केले गेले. लेनिन, स्टॅलिन, हिटलर, माओ, चाऊसेस्को, सद्दाम हुसेन, गडाफी ते फिडेल कॅस्ट्रोपर्यंतचा इतिहास ताजा आहे. या सर्व नेतृत्वाने आपल्याच हजारो, लाखो बांधवांना मारून टाकले, अमाप संपत्ती हडप केली आणि त्या त्या राष्ट्रातील नागरिकांना संवदेनाशून्य, बधिर करुन टाकले. इतका जुलूम करूनही या दैवतांचा प्रभाव त्यांच्या पश्चात दोनचार दशकापलीकडे जाऊ शकला नाही. एवढेच नाही, तर यांतील काही दैवतांना समाजाने ठेचून मारले.

भारत हे लोकशाही राष्ट्र असले तरीही आपल्या लाडक्या नेत्यांचे दैवतीकरण करण्याची मानसिकता मात्र हुकूमशाही समाजासारखीच दिसून येते. स्वातंत्र्यानंतर सुरुवातींच्या नेत्यांचे दैवतीकरण किंवा त्याचा अतिरेक हा त्यांच्या अनुयायांनी केलेला दिसतो. आपल्या लाडक्या नेत्याच्या क्षमतेला कुठलेच **मानवी नियम** लागू होऊ शकत नाहीत हाच अट्टाहास **दैवतीकरणाची पुटे** चढवण्यामध्ये या अनुयायांमध्ये दिसून येतो. या शिखरावर गांधी, नेहरू, फुले आणि आंबेडकर हे असले तरी सावरकर, विवेकानंद, सुभाषचंद्र बोस यांचे अनुयायीही यामध्ये काकणभरही कमी नाहीत. या सर्व महान नेत्यांनी मांडलेले विचार त्यांच्या अनुयायांनी केव्हाच इतिहासजमा करून टाकले आणि आपल्या नेत्याच्या शिकवणीच्या 'व्यस्त' भूमिका आणि 'जीवनशैली' हे अनुयायी जगू लागले. ही **दरीच** अनुयायांपेक्षाही त्यांच्या नेतृत्वाला **कालबाह्य** आणि **हास्यास्पद** ठरवू लागली. नक्षलवादी भूमिकेचे समर्थन करणारे विचारवंत जेव्हा नक्षलवादी हे गांधीवादाचे पुरस्कर्ते आहेत हे गंभीरपणे सांगू लागतात तेव्हा विनोदही

(पृष्ठ क्र ३ वर)

वर्ष तेरावे/अंक १२/डिसेंबर २०१२

वर्ष तेरावे/अंक १२/डिसेंबर २०१२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १७ वे/अंक ६ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक<br>डॉ. विजय बेडेकर | |
| २) | फिल्ड मार्शल जनरल के. एम. करिअप्पा – अेक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व | मा. ना. पाटील | ३ |
| ३) | महायोगी श्री अरविंदांची समाजशास्त्रीय विचारधारा | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | ६ |
| ४) | खबरबात पुस्तकांची | श्री. शरद जोशी | १२ |
| ५) | अनुष्टुप ज्ञानेश्वरी | मोहन पाठक | १७ |
| ६) | आंतरराष्ट्रीय बाल विज्ञान–गणित मेळावा | डॉ. सुधाकर आगरकर | १८ |
| ७) | यज्ञ मीमांसा | श्री. शं. बा. मठ | २२ |
| ८) | भारतीय संस्कृती–बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २८ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- ❖ दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- ❖ आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर<br>कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२<br>या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- ❖ www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश ‘विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा’ या नावाने पाठवावा.

– संपादक

# फिल्ड मार्शल जनरल के. एम. करिअप्पा - अेक महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्व

*फिल्ड मार्शल जनरल करिअप्पा यांच्या संदर्भातील काही आठवणींना माननीय मा. ना. पाटील यांनी या लेखातून उजाळा दिला आहे. - संपादक*

भारताच्या ब्रिटीश इंडियन सैन्यातील १९१९ मध्ये सुरुवातीला कनिष्ठ ऑफिसर (सेकंड लेफ्टनंट) म्हणून शिरलेले एक भारतीय नागरिक जे भारतात १९४७ मध्ये स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९४९ मध्ये भारतीय भू-दलाचे सर्वोच्च अधिकारी (जनरल, कमांडर-इन-चीफ) झाले, ते के. एम. करिअप्पा. त्यांच्याविषयी अनुभव सांगताना प्रथम त्यांचा पूर्व इतिहास थोडक्यात खाली देतो.

ब्रिटीश राजवटीत कर्नाकट प्रांतामध्ये म्हैसूर संस्थानात कूर्ग गावी १८९९ साली त्यांचा जन्म झाला. लहानपणापासून अति हुशार, चाणाक्ष माणूस म्हणून सर्व लोक त्यांना ओळखू लागले. त्या वेळी भारतावर ब्रिटिश राजवट होती. १९१९ मध्ये जनरल करिअप्पांनी भारतीय सैन्यामध्ये कनिष्ठ हुद्यावर ऑफिसर म्हणून सुरुवात केली. हळू हळू वरच्या हुद्यावर चढत चढत ते १९४९ मध्ये स्वतंत्र भारताच्या भूदलाच्या सर्वोच्च हुद्यावर जाऊन पोहोचले. १९४९ ते १९५३ या काळात ते भारतीय सैन्याचे (भूदलाचे) सर्वोच्च अधिकारी (जनरल कमांडर इन चीफ) पदावर होते. १९५३ मध्ये त्यांनी नोकरीतून निवृत्ती स्वीकारली.

स्वभावाने करिअप्पा अत्यंत सरळ, कडक धोरणी आणि सत्यवादी होते. तसेच त्यांच्या अंगात शिस्त व प्रामाणिकपणा भिनला होता. त्यांना कोणत्याही प्रकारची मेहेरबानी कोणाकडूनही आवडत नव्हती. १९५३ व १९५६ भारत पाकिस्तान युद्धाचे वेळी त्यांच्या कडक धोरणांचा भारताला खूप चांगला अनुभव आला होता. सैन्यातील पाकिस्तानचे सर्वोच्च अधिकारी आणि नंतर पाकिस्तानचे अध्यक्ष असलेले अयूब खान त्यांचे फाळणीपूर्वी भारतात मित्र आणि सहकारी होते. १९६५ च्या पाकिस्तान बरोबरच्या लढाईत जनरल करिअप्पांचा मुलगा भारतीय हवाई दलात विमान चालक (पायलट) म्हणून सेवेत होता. त्याला लढाईत पाकिस्तानचा लष्करी कैदी म्हणून अटक झाली होती. अयुब खानकडून मुलाबाबत जनरल करिअप्पांना देऊ केलेली मेहेरबानी करिअप्पांनी ठोकरुन लावली होती. ते म्हणाले होते, माझा मुलगा आणि इतर पाकिस्तानकडे असलेले भारतीय लष्करी कैदी यांच्यात मी कोणताही फरक करू इच्छित नाही. अशा प्रकारच्या अनेक गुणांनी जनरल करिअप्पा सर्वांना माहीत होतेच परंतु सर्व थरांतून त्यांना व्यक्ती म्हणून फार मोठा मान होता.

### लष्कर प्रमुख पदावरून निवृत्ती आणि जनरल करिअप्पांना मानवंदना

स्वतंत्र भारताचा लष्कर प्रमुख म्हणून १९४९ ते १९५३ या चार वर्षाच्या कालावधी अखेरीस जनरल करिअप्पा निवृत्त झाले आणि त्यांना मानवंदना देण्याचा मान मुंबईत प्रादेशिक सैन्याला मिळाला. त्याबद्दल सविस्तर लिहिण्यापूर्वी प्रादेशिक सैन्याविषयी दोन शब्द मांडतो.

### प्रादेशिक सैन्याविषयी थोडेसे

भारताच्या चतु:सीमा विचारांत घेता, भारतात उत्तरेकडे संपूर्ण भू-भाग, पूर्व, दक्षिण आणि पश्चिमेकडे संपूर्ण समुद्र भाग असे चित्र आहे. त्याचा मुकाबला करण्यासाठी भारताकडे कायमस्वरूपी संरक्षण व्यवस्था

आहे. या व्यवस्थेमध्ये भूदल आणि नौदल व पूरक सहाय्य करणारे तिसरे वायुदल. ही झाली जागतिक स्तरावरील व्यवस्था. याशिवाय अंतर देशीय सुरक्षेसाठी सर्व राज्यांमध्ये पोलीसदल, होम गार्डस, रेल्वे सुरक्षा दल आणि शाळा कॉलेजमधून एन.सी.सी. आणि काही राज्यामध्ये प्रादेशिक सैन्य (टेरीटोरीयल आर्मी) व्यवस्था आहे. कायम स्वरूपी भू दलाला पूरक सहाय करण्याचे कार्य प्रादेशिक सैन्य करते. महाराष्ट्रात मुंबईमध्ये प्रादेशिक सैन्याची एक बटालीयन १९४८ ते १९५५ पर्यंत राबविली जात होती. या सैन्यात सरकारी नोकरीतील तरुण व्यक्ती ऐच्छिक तत्त्वावर सैन्यात शिपाई आणि ऑफिसर म्हणून काम करीत होते. १९५५ नंतर सदर बटालीयन कोल्हापूरला पाठविण्यात आली आहे. त्यामुळे मुंबईमध्ये नोकरी करणारे लोक त्यातून बाहेर पडले. त्यांनी डिसचार्ज घेतला. अशी होती १९५३ मध्ये प्रादेशिक सैन्याची एक बटालीयन, त्या बटालीयनकडे जनरल करिअप्पांना मान वंदना देण्याची खास संधी चालून आली होती. त्या मान वंदना तुकडीमध्ये माझी प्रादेशिक सैनिक म्हणून निवड झालेली होती.

**मान वंदना (गार्ड ऑफ ऑनर)**

१९५३ साली निवृत्तीच्या दुसऱ्या दिवशी जनरल करिअप्पा मुंबईला येणार होते. त्यापूर्वी सुमारे १५ दिवस मुंबईला आझाद मैदानावर मान वंदनेची रोज तालीम होत असे. प्रादेशिक सैन्य बटालियनचे प्रमुख कर्नल देसाई जातीने रोज स्वतः हजर राहून आमची मान वंदनेची तालीम करुन घेत असत. लष्कराचे भूदल प्रमुख यांना निवृत्ती बद्दल लष्करी इतमामात सलामी देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी कर्नल देसाईवर सोपवली होती. त्यावेळी मुंबईला सहार विमानतळ (छत्रपती शिवाजी विमानतळ) नव्हते. जनरल करिअप्पांना घेऊन भारतीय वायूदलाचे खास विमान सांताक्रूझ विमान तळावर आले. जवळच मान वंदनेसाठी खास शामियाना उभारलेला होता. तेथे जनरल करिअप्पा आले. मान वंदना स्वीकारली. दोन शब्द बोलले आणि त्याच विमानाने कर्नाटककाकडे (बंगलोरला) रवाना झाले.

**निवृत्तीनंतर पुढे काय?**

निवृत्ती प्रीत्यर्थ मान वंदना स्वीकारून जनरल करिअप्पा लष्करी पेशातून बाहेर पडले. भारताच्या भूदलाचे सर्वोच्च अधिकारी असताना जनरल करिअप्पांनी पाकिस्तानशी दोन युद्धे हाताळली आणि त्याची फलश्रुती म्हणून भारत सरकारने त्यांना ''फिल्ड मार्शल'' पदवी बहाल केली. त्यांची उमदी कारकीर्द आणि महान व्यक्तिमत्त्वाचा विचार करून भारत सरकारने त्यांना उच्च पदावर नियुक्ती करून त्यांचा देशासाठी मोठा उपयोग करून घेतला. भारताचे अधिकृत प्रतिनिधी (हाय-कमिशनर) म्हणून त्यांची ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये उच्चायुक्त पदी नियुक्ती केली होती.

१९७१ च्या सुमारांस भारतातील एका प्रमुख पक्षाने जनरल करिअप्पांना भारताच्या खासदार पदासाठी निवडणुकीला उभे केले होते. मुंबईतील चेंबूर, घाटकोपर ते ठाणे अशा संयुक्त विभागासाठी ही खासदारकीची पंचवार्षिक निवडणूक होती.

**निवडणूक प्रचारासाठी जनरल करिअप्पा ठाण्यात**

निवडणुकीच्या पूर्व प्रचारासाठी जनरल करिअप्पा ठाण्यात आले होते. तो दिवस सुट्टीचा (रविवार) होता. त्यावेळी माझे वास्तव्य नौपाड्यातील कोपरी रोड (आताचा महात्मा गांधी रस्ता) आणि भास्कर कॉलनीच्या जंक्शनवर असलेल्या घरातील २ खोल्यांमध्ये होते. जनरल करीअप्पांची गाडी घरसमोर रस्त्यावर थांबलेली होती. जनरल करिअप्पा आणि त्यांचे ३/४ सहयोगी प्रचारासाठी आमच्या वाडीत आले आणि लोकांना भेटून मतांसाठी विनंती करीत होते. मी व्हरांड्यात बाहेर आलो आणि करिअप्पांना ओळखत असल्यामुळे त्यांना नमस्कार करून घरात येण्याची विनंती केली. त्यांनी सुद्धा काही आढेवेढे

न घेता ते आणि त्यांचे सहकारी घरात येऊन बसले. त्यांना पिण्यासाठी माठातले गार पाणी भरलेला एक स्टीलचा तांब्या आणि ३/४ ग्लासेस समोर स्टूलावर ठेवले. ते सर्वजण पाणी पीत असताना मी सौभाग्यवतीला लवकर डीशमधून पॅटीस आणण्यास सांगितले आणि ५ ते ६ कप चहा लवकर करण्यास सांगितले. रविवारचा सुटट्ीचा दिवस होता म्हणून त्या दिवशी मटारचे पॅटीस बनविण्याचे काम चालले होते. जनरल करिअप्पा नको नको म्हणत होते. मी मात्र त्यांचे न ऐकता आग्रह केला आणि म्हणालो 'सर हॉट अ‍ॅण्ड फ्रेश (मटार) पॅटीस आर रेडी अ‍ॅण्ड यू मस्ट टेक इट'. प्रचारासाठी फिरुन फिरुन भूक लागलीच होती. त्यामुळे त्यांनीही माझे म्हणणे ऐकून गरम गरम पॅटीस आणि चटणी आवडीने खाल्ली. ते म्हणालेही ओह व्हेरी नाईस, व्हेरी टेस्टी पॅटीस. आणि प्रत्येकाने दोन दोन पॅटीस चटणीबरोबर खाल्ले. तेवढ्यात सौभागयवतीने मस्त चहा करून आणला. ते सर्वजण चहा प्याले आणि मतांसाठी विनंती करुन निघाले.

जनरल करिअप्पांना निवृत्तीनंतर दिलेली मानवंदना, त्यांच्याविषयी थोडी इतर माहिती आणि निवडणूक प्रचाराच्या वेळचा पाहुणचार हे सर्व सदर लेखात नमूद करून दिशासाठी दिला आहे. वरील सर्व घटनांमुळे आनंद झालेला आहे. परंतु निवडणुकीत जनरल करिअप्पांचा पराभव झाला याचे वाईट वाटते. जनरल करिअप्पा १९९३ मध्ये वयाच्या ९४ व्या वर्षी हे जग सोडून गेले.

**– मा. ना. पाटील**
ज्येष्ठ कार्यकारिणी सभासद
विद्या प्रसारक मंडळ,
ठाणे.

●●●

## डॉ. शांतिस्वरूप भटनागर

**भारतीय थोर वैज्ञानिक डॉ. शांतिस्वरूप भटनागर यांचा जन्म सध्या पाकिस्तानात असलेल्या शाहपूर या गावी २१ फेब्रुवारी १८९४ रोजी झाला. लंडन विद्यापीठातून त्यांनी डी. एस. सी. ही पदवी मिळवली. त्यानंतर पं. मदन मोहन मालवीय यांच्या विनंतीवरून ते बनारसच्या हिंदू विद्यापीठात रसायनशास्त्राचे प्राध्यापक म्हणून अध्यापन करू लागले. १९२६ पासून त्यांनी चुंबकीय रसायनशास्त्रातील संशोधनास प्रारंभ केला. उसाची मळी, नारळाची करवंटी, ताग, कापसातील कचरा यांपासून उपयुक्त पदार्थ मिळविण्याच्या प्रक्रिया त्यांनी विकसित केल्या. भारतात स्वतंत्रपणे व वर्गीकरणाद्वारे संशोधन व्हावे ही अतिशय महत्वाची गोष्ट त्यांनी सरकारला पटवून दिली आणि त्यातून १४ राष्ट्रीय प्रयोगशाळांची मालिका अतिशय कष्टाने त्यांनी उभी केली. त्यामुळे भारताच्या औद्योगिक विकासाचा पाया घालणारे शास्त्रज्ञ म्हणून त्यांना ओळखले जाऊ लागले. 'कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च' या संस्थेचे १९४२ साली ते पहिले संचालक झाले. नैसर्गिक साधन संपत्ती व वैज्ञानिक संशोधन मंत्रालयाचे ते पहिले सचिव होते. तसेच विद्यापीठ अनुदान मंडळाचे ते पहिले अध्यक्ष होते. १९५७ पासून त्यांच्या नावाने 'शांतिस्वरूप भटनागर पारितोषिक' दिले जाते. अशा या भारतीय शास्त्रज्ञाचे १ जानेवारी १९५५ रोजी निधन झाले.**

# महायोगी श्रीअरविंदांच्या समाजशास्त्रीय विचारधारेवर आधारित

लेखांक-४

*योगी श्रीअरविंदांच्या संबंधातील लेखमालेतील पुढील लेख - संपादक*

मागील लेखामध्ये सांगितल्याप्रमाणे लोकशाहीचे मुख्य तत्त्व कोणते, आदर्शभूत रचना कोणती आणि ती प्राप्त करण्यास अडथळे का येतात इत्यादी गोष्टींचा विचार करण्यापूर्वी मानव आणि मानवी समाज यांच्या संबंधी श्रीअरविंदांनी मांडलेल्या मांडलेल्या मूलभूत विचारांची एकत्रितपणे थोडक्यात उजळणी करू.

पहिला मुद्दा हा की मानव म्हणजे शरीर व मन असलेला 'आत्मा' आहे, परमात्म्याचा अंश आहे आणि परमात्म्याशी एकरूपता साधण्यासाठी आध्यात्मिक प्रगती करणं हा मानवी जीवनाचा हेतू आहे.

दुसरा मुद्दा हा की मानवी समाजाला, समूहाला सुद्धा एक शरीर, एक मन आणि एक आत्मा असतो आणि या पृथ्वीतलावर दैवी जीवनाकडे वाटचाल करणं हा या समाज जीवनाचा हेतू आहे.

तिसरा मुद्दा अर्थातच समन्वयाचा. ज्याप्रमाणे प्रत्येक व्यक्तिमात्राने आपली प्रगती आपल्या इच्छेनुरूप साधत असताना भोवतालच्या समाजाशी समन्वय राखणे आवश्यक असते, त्याचप्रमाणे समाजाने आपली प्रगती साधत असताना आपल्या प्रत्येक घटक-मानवास आपापल्या पद्धतीनुसार आपली प्रगती साधण्यास वाव देणे गरजेचे असते.

आता या विचारांच्या पार्श्वभूमीवर लोकशाही, तिची वैशिष्ट्ये आणि मिळणारे यशापयश याकडे नजर टाकू.

**लोकशाही -**

लोकशाहीचे प्रमुख तत्त्व म्हणजे 'स्वातंत्र्य'(Liberty). लोकशाही प्रत्येक व्यक्तिमात्राला आचार स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य तर देतेच पण त्याशिवाय प्रत्येकास स्वतःची प्रगती स्वतःच्या पद्धतीने स्वतःच्या इच्छेनुसार करण्याचे स्वातंत्र्य देऊन तशी संधी उपलबध करून देते. मात्र या स्वातंत्र्याचा अमर्याद उपभोग घेत असताना प्रत्येक व्यक्तिमात्राने इतरांच्या व्यक्तिगत स्वातंत्र्याचा आणि हक्कांचा आदर राखावा अशी अट असते.

लोकशाही राज्यपद्धतीमध्ये मुख्य अपेक्षा असते की प्रत्येक व्यक्तीची बौद्धिक विचारशक्ती पुरेशी सक्षम असावी. इतरांनी मांडलेला विचार समजून घेण्याची कुवत असावी आणि त्यावर स्वतःचे मत ठरवण्याची क्षमता असावी. अशा तऱ्हेने अनेक व्यक्तींच्या मतांच्या एकत्रीकरणातून आणि समन्वयातून एक सामायिक निर्णय तयार होऊ शकतो आणि मग तो सर्वांवर बंधनकारक असतो.

लोकशाही व्यवस्थेची ही झाली आदर्श चौकट. प्रत्यक्षात मात्र ही मूल्ये प्रस्थापित होताना दिसत नाहीत. कारण समाजात बहुसंख्येने असणारा मानवी समुदाय हा अजूनही आपल्या Infra-Rational Stage वरील मानसिकतेतच वावरत असतो. तर्कशास्त्राच्या कसोटीवर घासून स्वतःचे मत बनवण्यास तो असमर्थ असतो. त्यामुळे कधी तो आपल्या पूर्वग्रहांना बळी पडतो. कधी तो आपल्या

काही भोग असे असतात की ते भोगूनच संपवावे लागते. देहभावाची आसक्ती गेली, तरच शरीराचा मोह होणार नाही.

सामान्य आवडी-निवडींना प्राधान्य देतो तर कधी त्याच्यापेक्षा बुद्धिमान आणि चलाख असणारी व्यक्ती त्याच्या मनावर आणि मतावर प्रभाव पाडते.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तर्कशास्त्राचा उपयोग करून समन्वय साधण्याची आवश्यकता असते आणि त्यातून सहमती कशी साधावी हे रॅशनल स्टेजवर गेलेल्या अनेकांच्या गावीही नसते. तर्कशास्त्राचा वापर केला जातो तो फक्त संघर्षासाठी; आपला मुद्दा ठासून इतरांवर लादण्यासाठी. अर्थात रॅशनल स्टेजवर जाऊनही मानव असा का वागतो तर या पातळीवर तो आपल्या बौद्धिक विचारशक्तीवरच विसंबून असतो. या बौद्धिक विचारशक्तीने निर्माण केलेल्या निरनिराळ्या बाह्य रचना, संस्था अथवा व्यवस्था यांच्या योगेच समाजाची प्रगती होईल असा त्यांचा अहंकारी विश्वास असतो. आणि त्यामुळे आपल्या बौद्धिक सामर्थ्याचा उपयोग करून स्वतःच्या बाह्य जीवनाचा हेतू व संकल्पना तो इतरांच्या जीवनावर लादू पाहतो. परंतु यामुळे आपापली प्रगती आपापल्या पद्धतीने करायचे इतरांचे 'स्वातंत्र्य' संकोच पावू लागते.

यामुळे समाज मूळ आदर्शांपासून दूर जातो. लोकशाहीचा महान प्रयोग जरी छोट्या लोकसमूहांत क्वचित यशस्वी होताना दिसला तरी सामाजिक घटकाची व्याप्ती जसजशी विशाल होते, बहुआयामी होते तसतसे लोकशाही यशस्वी करणे अवघड बनते.

अशा या परिस्थितीत समाजातील तथाकथित विचारवंत लोकशाही टिकवण्यासाठी अध्यक्षीय लोकशाही संसदीय लोकशाही असे निरनिराळे प्रयोग करू पाहतात. त्यापैकी ब्रिटीशांच्या राजकीय बुद्धिमत्तेतून निर्माण झालेली संसदीय लोकशाही ही व्यवस्था सर्वात लोकप्रिय असल्याने तिचा थोडक्यात विचार करू.

**संसदीय लोकशाही –**

सामाजिक घटकांची व्याप्ती जेव्हा वाढू लागते तेव्हा परस्पर विचारविनिमय करुन निर्णय घेणे अवघड असते आणि म्हणून छोट्या छोट्या सामाजिक घटकांचे प्रतिनिधी निवडून त्या प्रतिनिधींमध्ये विचारविनिमय साधण्याची जी संकल्पना आणि व्यवस्था अस्तित्वात आली तीच संसदीय लोकशाही. आधुनिक जीवनात राजकारण, अर्थकारण, समाजकारण यांचे इतके निरनिराळे प्रश्न निर्माण होत आहेत की त्या सर्वांविषयी व्यक्तिगत पातळीवर चर्चा करून समन्वय साधणं अवघड आहे आणि म्हणून आधुनिक जगतात लोकशाही प्रस्थापनेसाठी संसदीय लोकशाही हा एक आवश्यक टप्पा ठरतो.

पक्षनिर्मिती आणि पक्षीय राजकारण हा संसदीय लोकशाहीचा एक अनिवार्य भाग असतो. सुरुवातीस थोडेच पक्ष असतात पण हळूहळू निरनिराळी नावं आणि निनिराळे कार्यक्रम घेऊन असंख्य पक्ष निर्माण होतात व त्यानंतर त्यांचा सत्ता-संपादनार्थ एकमेकांशी अत्यंत अनावश्यक असा संघर्ष चालू होतो. आणि अशा प्रकारच्या संघर्षामुळे नुकसान होते ते समाजाचे.

१९६९-७० सालच्या सुमारास इंदिराजी माताजींचे आशीर्वाद घेण्यासाठी पाँडिचेरीस गेल्या होत्या. त्यावेळी त्यांना माताजी म्हणाल्या अनेक वर्ष देशांचे कारभार हे मतभेदातून आणि विरोधातून करण्याची सवय झाली आहे. मात्र आतां time has come to govern through union, understanding and collaboration. पुढे माताजी असं म्हणाल्या की greatness of country does not depend on a victory of a party but the union of all parties. थोडक्यांत माताजीना असं सुचवायचं होतं की पक्षीय संघर्ष थांबवावा. सर्व पक्षांनी एकत्र बसून समन्वय साधावा आणि देशाची, देशातील जनतेची प्रगती साधावी. दुर्देवाने तसे घडूं शकले नाही. यानंतर पुढे साधकांशी बोलताना माताजी असेही म्हणाल्या की कालांतराने हे सर्व

राजकीय पक्ष लोकांना हास्यास्पद वाटू लागतील. चाळीस वर्षांनंतर त्यांचे शब्द खरे ठरलेले आपण पाहत आहोत.

संसदीय लोकशाहीत सत्ता प्राप्त करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेस फार मोठे महत्त्व असते. सत्ताधारी पक्षाच्या विरोधांत आपापले झेंडे घेऊन अनेक पक्ष निवडणुकीत उतरतात. त्यांच्या मतांची विभागणी होते आणि त्यामुळे केवळ ३०% मते मिळवूनही एखादा पक्ष विजयी ठरतो व सत्ताधारी बनतो. यामुळे अनेकदा सत्ताधारी आपल्याच मतदारांचे हित जपताना दिसतात. इतरांची नाराजी ओढवून घेतात. समन्वय साधता येत नाही. संघर्ष चालूच राहतो. समाजाची शक्ती त्यातच खर्ची पडते.

संसदीय लोकशाहीतील दुसरे महत्वाचे स्थान म्हणजे संसदीय चर्चा, संसदेमध्ये चर्चा करायची असते. ती समन्वय साधण्यासाठी निरनिराळ्या घटकांच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या विचारांतून समन्वय साधून सर्वसंमत असा सामायिक निर्णय घेण्याची गरज असते. पण तसे होताना दिसत नाही. पक्षीय राजकारणामुळे सत्ताधारी पक्ष बहुमताच्या जोरावर आपले मत, आपला हेतू, आपला विचार इतरांवर लादू लागतो. यातूनच पक्षीय संघर्ष शिगेला पोहोचतो.

स्वतःच्या बुद्धिमत्तेचा गर्व असणारा मानव अशा प्रकारे लोकशाहीत निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर तोडगे काढत राहतो. पण तरीही मूळ प्रश्न सुटत नाही गुंतागुंत वाढतच राहते. अनेक नवीन प्रश्न निर्माण होतात. असे का होते? हे स्पष्ट करताना श्रीअरविंद सांगतात की मानवी जीवन हे खूप Complex आहे, व्यक्तिगत पातळी, सामाजिक पातळी, राष्ट्रीय पातळी आणि त्यांचे परस्परांवर होणारे परिणाम; शिवाय मानव म्हणजे केवळ शरीर, मन व बुद्धी नव्हे तर मानवाच्या सूक्ष्म देहांत 'आत्मा' सुद्धा आहे. आधुनिक मानव त्या आत्म्याला ओळखू शकत नाही. त्याचा व्यापार त्याला उमजत नाही आणि त्यामुळे मानवी बुद्धीने काढलेल्या तोडग्यातून जीवन बाहेर पडते. प्रश्न कायमच राहतात किंबहुना त्यांना फाटे फुटून ते अधिक उग्र बनतात.

या संपूर्ण परिस्थितीचा परिणाम काय दिसतो तर 'स्वातंत्र्य' असलं तरी त्याचा संकोच होऊ लागतो. विशिष्ट वर्गाची, पक्षाची हुकुमत असल्याने काही गट दुर्लक्षित राहतात. विशेषतः जे संघटित नसतात ते होरपळून जातात. त्यामुळे समता कुठेही निर्माण होताना दिसत नाही. छोट्या मोठ्या गटांमध्ये जी जीवघेणी स्पर्धा निर्माण होते त्यामुळे बंधुत्वाची भावनाही निर्माण होत नाही.

समाजातील काही घटक रॅशनॅलिटीच्या टप्प्यावर गेल्यामुळे लोकशाही व्यवस्था निर्माण झाली हे आपण पाहिले आणि त्याच बरोबर समाजातील बहुसंख्य घटक हे Infra Rational टप्प्यावर असल्याने लोकशाही यशस्वी होणे कसे अवघड होते तेही पाहिले. अशा तऱ्हेने बहुसंख्य समाज हा प्राणिक (vital) पातळीवर असतो. स्वतःच्या प्राणिक जीवला (vital being) सर्वश्रेष्ठ मानून त्याचे समाधान करणे हाच त्याच्या दृष्टीने जीवनाचा हेतू असतो. वासनापूर्ती आणि स्वामित्व हे या प्राणिक जीवनाचे मुख्य वैशिष्ट्य असते आणि यामुळे या पातळीवरील मानवाला स्वतःच्या समाधानासाठी ३ गोष्टींची गरज असते.

१) शक्य असेल तेवढं सामर्थ्य प्राप्त करून त्याची अंमलबजावणी करणं. २) स्वतःकडे असणारे गुण दाखवण्याची संधी मिळणं आणि त्याबद्दल इतरांकडून प्रशंसा मिळणं, ३) स्वतःच्या इच्छा, आकांक्षा पूर्ण करुन आनंद उपभोगणं, पुरातनकाळी या गोष्टी वंशपरंपरागत मार्गाने काहींना मिळत तर काही त्यापासून वंचित राहत. आधुनिक काळात स्पर्धा हाच निकष ठरला. ही स्पर्धा जोपर्यंत निकोप असते तोपर्यंत ती योग्य ठरते. मात्र यानंतर या स्पर्धेस जोड मिळते. ती पैशाची, पैशाच्या सामर्थ्याची आणि त्यातूनच मग या प्राणिक पातळीवर असलेल्या

माणसांचा Economic Barbarism निर्माण होतो. भौतिक विज्ञानाच्या साथीने त्यातूनच Industrial, Econimic, Commercial युग निर्माण झालं. लोकशाहीचा ताबा घेऊन Capitalist Democracy हा एक नवा अवतार निर्माण झाला.

या नवयुगाचा मानव हा जरी आधुनिक शिक्षण घेतलेला असला तरी तो व्यक्तिशः vital पातळीवर असतो. श्री अरविंदांनी त्याला Economic man म्हणून संबोधलं आहे. अशा या माणसाचा जीवनाकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन असतो त्याचं श्रीअरविंदांनी सार्थ दर्शन घडवलं आहे. हा आर्थिक मानव 'काव्य आणि कला' यांच्याकडे डामडौल दाखवण्याच्या दृष्टीने तरी पाहतो किंवा त्यांचा उपयोग जाहिरात करण्यासाठी करतो. स्पर्धेमध्ये टिकून राहण्याची क्षमता देणारं एक साधन म्हणून तो शिक्षणाकडे पाहतो. त्याच्या दृष्टिकोनातून राजकारण कशासाठी करायचं तर औद्योगिकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवनवीन बाजारांची निर्मिती करण्यासाठी. नैतिकतेची त्याची संकल्पना सामाजिक प्रतिष्ठा ठरते. आणि ती सामाजिक प्रतिष्ठा कोणाला मिळते तर कोणत्या ना कोणत्या उद्योगांत यशस्वी होऊन गडगंज संपत्ती मिळवली असेल त्याला आणि म्हणून या युगातील आदर्श माणूस कोण ठरतो "neither the cultured, nor noble, nor moral, nor religious but the successful enterpruner." तर या परिस्थितीत जीवनाच्या सर्व अंगांच बाजारीकरण होऊ लागतं. शिक्षणाचा बाजार, कलेचा बाजार, साहित्याचा बाजार आणि धर्माचा बाजार.

या परिस्थितीत सरकार जरी कोणत्याही पक्षाचं असलं तरी समाजाच्या, शासनाच्या नाड्या उद्योगपतींच्या हातात असतात. लोकशाहीच्या मार्गाने निवडणुका होत असल्या तरी उद्योगपतींच्या पैशाचं पाठबळ असेल तेच निवडून येतात नाही तर निवडून आलेले काही प्रतिनिधी उद्योगपतींच्या पंखाखाली जातात. भांडवलशाहीच्या या जबरदस्त शक्तीपुढे सामान्य माणूस हतबल होतो. स्वातंत्र्य उरत नाही. समता निर्माण होत नाही आणि बंधुत्वाचा तर कोणी विचारही करत नाही. यातून एक गोष्ट काही विचारवंताना जाणवू लागते की मानवाच्या व्यक्तिवादी बुद्धीसामर्थ्याने ज्या एका आदर्श व्यवस्थेची संकल्पना डोळ्यासमोर ठेवलेली होती ती ही नव्हे. भांडवलशाहीच्या अतिरेकामुळे श्रीमंत अधिक श्रीमंत होतात, तर गरीब अधिक गरीब होतात. विचारवंताना स्पष्टपणे जाणवू लागतं की समाजाचं दोन गटांमध्ये विभाजन झालं आहे. एक गट असतो पिळणाऱ्यांचा आणि दुसरा गट असतो पिळल्या जाणाऱ्यांचा. अशा प्रकारच्या परिस्थितीतूनच पिळल्या जाणाऱ्यांची मुक्तता करण्यासाठी १९ व्या शतकाच्या अखेरीस युरोपमध्ये समाजवादाचा, साम्यवादाचा उदय झाला.

**समाजवाद-साम्यवाद -**

समाजवादाचे, साम्यवादाचे मुख्य तत्त्व 'समता'. केवळ राजकीय पातळीवरच नव्हे तर सामाजिक पातळीवरही समता स्थापन करणे हे समाजवादाचे ध्येय त्यासाठी प्रथम सर्वांना समान संधी प्राप्त करून देणे आवश्यक असते. परंतु समाजातील निरनिराळे घटक जोपर्यंत निरनिराळ्या पातळीवर असतील, म्हणजे त्यांचा सामाजिक दर्जा वेगवेगळा असेल तोपर्यंत समान संधीची संकल्पना प्रत्यक्षात येणे अवघड असते आणि म्हणून विशेषतः साम्यवादी राज्यसंस्थानी वंशपरंपरेने चालत आलेला जमीन-जुमल्यावरील हक्क रद्द केला. सर्व जमीन ही समाजाची मानली गेली. सर्वांनी मिळून जमीन कसावी. येईल त्या उत्पन्नातला काही भाग सरकारला म्हणजेच समाजाला द्यावा आणि बाकीचा सर्वांनी वाटून घ्यावा. ही व्यवस्था वैयक्तिक स्वार्थ टाळण्याच्या दृष्टिकोनातून योग्य होती हे नाकारता येणार नाही. परंतु वैयक्तिक प्रगतिसाठी आवश्यक असलेल्या 'स्वातंत्र्याचा' संकोच झाल्यामुळे वैयक्तिक प्रगतीला मर्यादा येऊ लागल्या. त्यातच पुढे

रॅशनल मन या व्यवस्थेच्या विरोधात जाण्याची बीज रोवली गेली.

साम्यवादी पद्धतीत उत्पादनाच्या सर्व साधनांची मालकही राज्यसंस्थेकडे म्हणजेच पर्यायाने समाजाकडे गेली. लोकशाहीत जी अनावश्यक आर्थिक स्पर्धा निर्माण झाली होती. जो संघटीत असा जीवघेणा आर्थिक संघर्ष निर्माण झाला होता तो नाहीसा करावा. शांतीचे वातावरण निर्माण करुन हळू हळू परस्पर सामंजस्य निर्माण करावे अशी एक आदर्श संकल्पना या विचारांत होती. निर्मिती प्रक्रियेतील अनेक अनावश्यक बाबी दूर सारल्यामुळे निर्मिती स्वस्त आणि मुबलक होऊन समाज सुखी होईल अशी कल्पना होती. परंतु तसे घडले नाही. निर्मितीमधील एकसुरीपणामुळे जीवनातील विविधता आणि सौंदर्य नाहीसे झाले.

साम्यवादी व्यवस्थेत व्यक्तीला स्वतंत्र स्थान नाही. व्यक्तीचे अस्तित्व हे केवळ समाजाचा एक घटक म्हणूनच असते. तिचे शिक्षण, त्याचे काम, त्याचे मन, त्याची मालमत्ता सारे काही समाजाचे असते. समाजामुळे त्यास मिळाले अशी भावना त्याने ठेवणे अपेक्षित असते. समाज मनाचा सामायिक निर्णय प्रथम होतो आणि तो वैयक्तिक मनावर लादला जातो आणि म्हणूनच स्वतःची प्रगती स्वतःच्या पद्धतीने करण्याचे स्वातंत्र्य हवे असणारे वैयक्तिक मन त्याविरोधात उठाव करते.

लोकशाही व्यवस्थेमधील अनावश्यक स्पर्धा व संघर्ष टाळण्याचा साम्यवादी व्यवस्थेने केलेला प्रयत्न तसेच समाजात समता निर्माण करण्याचा प्रयत्न हे रॅशनल पातळीवर आलेल्या मानवाच्या बौद्धिक विचारशक्तीची फार मोठी भरारी होती हे नाकारता येणार नाही. पण तरीही ही व्यवस्था यशस्वी होऊ शकली नाही. कारण मानव म्हणजे केवळ शरीर, मन व बुद्धी यांना दिशा दाखवत असतो ही वस्तुस्थिती रॅशनल मानव जाणत नाही. स्वतःची प्रगती, स्वतःच्या इच्छेने, स्वतःच्या पद्धतीने करण्याचे मानवाला हवे असलेले स्वातंत्र्य या व्यवस्थेत नाकारले गेले. समतेचे तत्त्व आंतरिकांतून निर्माण होण्याची गरज असताना बाह्य व्यवस्थेतून यांत्रिकी पद्धतीने लादले गेले. लोकशाही व्यवस्थेत वैयक्तिक मन व सामूहिक मन यांच्यात समन्वय निर्माण होऊ शकला नाही. तर साम्यवादी व्यवस्थेत मूठभर विचारवंतांनी ठरवलेले सामायिक मत संपूर्ण समाजावर वरून लादण्यात आले. व्यक्तिवादी मानवाच्या स्वातंत्र्याची तहान लागलेल्या मनाला हे सहन होऊ शकले नाही आणि त्यातूनच या साम्यवादी व्यवस्थेचा शेवट झाला.

साम्यवादी व्यवस्थेतील काही आत्यंतिक मुद्यांना काहीसे सौम्य स्वरुप देऊन 'लोकशाही समाजवाद' निर्माण करण्याचा गोंडस प्रयत्न काही विचारवंतांनी केला. या व्यवस्थेत 'स्वातंत्र्य' आणि 'समता' या दोन्ही तत्त्वांना एकाच वेळी प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात धड स्वातंत्र्य नाही आणि धड समता नाही अशी स्थिती झाली. समाजवादाचे नावही कालांतराने बाजूला पडले आणि साहजिकच ही व्यवस्थासुद्धा यशस्वी होऊ शकली नाही.

अनार्किझम – या शब्दाचा जो श्रेष्ठतर अर्थ आहे. त्या दृष्टीने या टप्प्यावर समाजातील घटकांमध्ये ऐच्छिक सहकार निर्माण व्हावा, आंतरिकातून बंधुत्वाची भावना रुजावी आणि त्यामुळे सहजरित्या समन्वय साधला जावा असे अपेक्षित असते. त्यामुळे या व्यवस्थेस शासनाची गरज उरणार नाही साम्यवादाच्या दुसऱ्या टप्प्यावर समता प्रस्थापित झाल्यावर बंधुत्वाची भावना निर्माण करुन समाज तिसऱ्या टप्प्यावर जावा अशी अपेक्षा होती. परंतु रॅशनल मनाच्या बौद्धिक विचारशक्तीला त्यांच्या बाह्य संस्थाच्या योगे ते साधता आलं नाही आणि त्यामुळे शासन विरहीत असा तिसरा टप्पा हे केवळ स्वप्नच ठरले.

मानवाच्या रॅशनल मनाच्या बौद्धिक विचारशक्तीला या निरनिराळ्या प्रयत्नांत अपयश का आल ते आपण

वेळोवेळी पाहिलं. आता यानंतर कोणत्या पद्धतीने आणि कोणत्या दिशेने वाटचाल केल्यास मानवी समाज आपली प्रगती साधू शकेल तसेच पाँडिचेरी आश्रमात आणि ऑरोव्हिलेमध्ये माताजींनी कोणती दिशा दाखवली ते पुढील लेखात पाहू.

**श्री. नरेन्द्र नाडकर्णी**
सीडी. १०१, सी. १,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी – २५३३३१६०
E mail : nd_nadkarni@yahoo.com

●●●

## विस्मरणातील म्हणी

- गरे गरे मालकाला आणि शेंडे बुडखे रेडकाला.
- गवत्या बसला जेवाया आणि ताका संगे शेवया.
- गवळ्याचा रेडा नि गुजराचा स्वामी.
- गळा नाही सरी सुखी निद्रा करी.
- गळ्यात गळेसर नको, पण खाली अडसर पाहिजे.
- गळ्यातले तुटले ओटीत पडले.
- गाठ पडली ठकाठका! त्याचे वर्म जाणे तुका!
- गाढवांचा गोंधळ व लाथांचा सुकाळ
- गाता गळा, शिंपता मळा.
- गाव करी ते राव न करी.
- गाव जळे नि हनुमान बेंबी चोळे.
- गावात लगीन, कुत्र्यांचा बोंबाळ.
- गुरु-शिष्य गोसावडे, खायला पाहिजेत पेढे.
- गुळाचा गणपती आणि गुळाचा नैवेद्य.
- गोड बोलावे ओठात, कपट ठेवावे पोटात.

## शरीराच्या हालचाली

सुट्टीच्या दिवशी किंवा घरी निवांत असताना शरीरही आळसावलेले असते. परंतु, व्यायामाची सवय मोडली, तर आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतात. घरी निवांत क्षणी आपण टीव्ही पाहण्यात, गप्पा मारण्यात किंवा खाण्याचा आनंद घेण्यात दंग होऊन जातो. अशा वेळीही शरीराची आणि आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असते. दिवसभरात सातत्याने शरीराची हालचाल झालीच पाहिजे. त्यासाठी अगदी सोप्या सोप्या युक्त्या आहेत. मुलांबरोबर लपाछपी, पकडापकडी खेळण्यातूनही उत्तम व्यायाम होऊ शकतो. मुलांचाही कंटाळा जाऊन त्यांना नवा उत्साह येतो. जिन्याच्या पायऱ्या चढणे, घरातली स्वच्छतेची कामे करणे, मैदान किंवा अंगण असेल तर गवत काढणे, कचरा काढणे हीसुद्धा शरीराला हालचाल आणि व्यायाम देणारी कामे ठरू शकतात. घरच्या घरी सूर्यनमस्कार, योगासने, प्राणायामसारखे व्यायामही करता येतात. शरीराची हालचाल सर्वांत महत्वाची. त्यातून नवी ऊर्जाही मिळते आणि कामाला उत्साह येतो.



साहित्य विश्व

# खबरबात पुस्तकांची

**मासिक डोंबिवलीकर (एक सांस्कृतिक परिवार) चा ऑगस्ट २०१२ चा संग्राह्य विशेषांक**

गेली काही वर्षे डोंबिवलीहून मासिक डोंबिवलीकर हे दर्जेदार मासिक प्रकाशित होत आहे. आमदार रविंद्र चव्हाण हे संपादक आहेत. प्रभू कापसे हे कार्यकारी संपादक आहेत आणि सुप्रसिद्ध पत्रकार व लेखक सुधीर जोगळेकर हे संपादकीय सल्लागार आहेत. कार्यालयीन पत्ता असा, 'डोंबिवलीकर, ६, नव आशुतोष कोपर्डे हॉस्पिटलच्या खाली, टिळक पुतळ्याजवळ, टिळकनगर, डोंबिवली-पू., जि. ठाणे - ४२१२०२.

**स्वातंत्र्य दिन विशेषांक**

स्वातंत्र्यदिनानिमित्त ऑगस्ट-२०१२ चा विशेषांक (मूल्य रु. ३०/-) प्रकाशित झालेल्या आहे. त्याचा विषय आहे. 'स्वातंत्र्य' या अंकाचे वैशिष्ट्य म्हणजे संपादक आमदार रविंद्र चव्हाण यांचे उत्कृष्ट संपादकीय 'भारताला महसत्ता नव्हे, महान राष्ट्र बनवू या.' अवश्य वाचावे. याशिवाय 'स्वातंत्र्य'(प्रकाश धुळे), राजकीय स्वातंत्र्य (विनय सहस्त्रबुद्धे), भाषा स्वातंत्र्य सूचीकार व संपादक, मराठी लेखन कोश- अरुण फडके, अभिव्यक्ती स्वातंत्र्य (प्रकाश धुळे), व्यक्ति स्वातंत्र्य(अवधूत पुरस्कार), धर्म स्वातंत्र्य (डॉ. सच्चिदानंद शेवडे), लैंगिक स्वातंत्र्य (डॉ. उल्हास कोल्हटकर), व्यवसाय स्वातंत्र्य (डॉ. गिरीश जाखोटिया), लेखन स्वातंत्र्य (संजय आवटे), नाट्य-चित्रपट स्वातंत्र्य (आनंद म्हसवेकर), आर्थिक स्वातंत्र्य (चंद्रशेखर टिळक), सामाजिक स्वातंत्र्य (रमेश पतंगे), स्वातंत्र्यदेवीची विनवणी (वि. वा. शिरवाडकर), स्वातंत्र्य माझे (माधवी घारपुरे) हे सारे लेख महत्त्वाचे आहेत, वाचनीय आहेत. ह्या अंकाचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्र टाईम्सचे माजी संपादक भारतकुमार राऊत यांच्या कर्तृत्वाविषयी विशेषतः त्यांच्यातील संपादकाविषयी पत्रकार श्रीराम शिधये यांचा लेख. या सर्वांमुळे अंक संग्राह्य ठरला आहे. संपादक आमदार रविंद्र चव्हाण आणि सारे लेखक यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

**मोरया प्रकाशन (डोंबिवली)**

श्री. दिलीप महाजन यांच्या मोरया प्रकाशन ६, 'दिव्यकुंज' सुदर्शन नगर, आर-१०, एम्. आय. डी. सी., डोंबिवली-पूर्व-४२१२०३, पुणे कार्यालय : 'अनुश्री' ४०/१०, एरंडवणा, इंदिरा हाईटस्‌जवळ, पुणे - ४११०३८ यांनी २३-८-२०१२ रोजी प्रकाशनाची २५ वर्षे पूर्ण केली आहेत. 'सुविचार आणि सुसंस्कार यांचा प्रचार, हाच विचार' हे ब्रीद घेऊन प्रकाशनाचे २५ वर्षात लहानमोठी ३०० हून अधिक पुस्तके प्रकाशित करून मराठी प्रकाशन व्यवसायात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. काश्मीर : धुमसते बर्फ (My Frozen Turbulence in Kashmir) या जगमोहन यांच्या पुस्तकाचा कै. मो. ग. तपस्वी यांनी केलेली अनुवाद 'गोष्टी आपल्या सुखदुःखाच्या' - कै. चं. प. भिशीकर, 'समर्थ शिष्य कल्याण'- गणेश शंकर देव इ. महत्त्वाची पुस्तके होत. या रौप्यमहोत्सवानिमित्तने पुढील वर्षात जुनी/नवी २५ पुस्तके प्रकाशित करण्याचा दिलीप महाजन यांचा संकल्प. आजवर त्यांना पत्नीची (सौ. सुरेखा महाजन) मोलाची साथ लाभलेली आहे. आता त्यांच्या दोन्ही कन्या सौ. योगिनी आठल्ये व गौरी देव प्रकाशनाच्या कामात रुची घेत असून हा वसा पुढे चालविण्याचें ठरविले आहे. मोरया प्रकाशनाचे व दिलीप महाजन यांच्या परिवाराचे मनःपूर्वक अभिनंदन!

**अनघा तांबोळी (बंगलोर) यांचा काव्यसंग्रह 'भेळ'**

नवोदित कवयित्री अनघा तांबोळी (६९२, पहिला

मजला,18th मेन, 20th क्रॉस, बनशंकरी -लींड स्टेज, बंगलोर - ५६००७०) यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला आहे. ( पृ.५६ मूल्य रु. ८०/-) प्रकाशक आहेत. विद्यावर्धिनी प्रकाशन, ज्ञानमाता चौक, इगतपुरी - ४२२४०३ जि. नाशिक.

या काव्यसंग्रहात 'जनरेशन गॅप', 'कवी', 'माणुसकीची शाळा', 'आनंद' इ. २४ कविता आहेत. साऱ्या कविता उत्तम आहेत. समाजाचे विविध प्रश्न, समाज, त्याचा परिवार यांचे सूक्ष्म अवलोकन त्यांनी या कवितेतून मांडले आहे. त्यांच्या प्रत्येक कवितेत काहीना काही नवा विचार मांडलेला आहे. तो मनाला भावतो. त्यांच्या या पहिल्याच काव्यसंग्रहाने एक मोठी भरारी मारलेली आहे. त्यामुळे त्यांनी अधिकाधिक लेखन करावे असे सुचवावेसे वाटते.

## वि. आ. बुवा यांची प्रस्तावना

सुप्रसिद्ध विनोदी लेखक वि. आ. बुवा यांची मार्मिक प्रस्तावना संग्रहास लाभलेली आहे. ते म्हणतात, ''काव्य हे दोन प्रकारचे असते.' 'होणारे काव्य' आणि 'कलेले काव्य'. 'होणारे काव्य' हे आतूनच निर्माण होऊन शब्दबद्ध होत असते तर दुसरे मारुन मुटकून केलेले असते. अनघा तांबोळी यांचे काव्य हे पहिल्या वर्गात म्हणजे 'आतून होणारे' या वर्गातले आहे. हे प्रत्येक कविता वाचताना जाणवते. हलके फुलके आणि प्रगल्भ दोन्ही प्रकारचे काव्य त्या सहज करू शकतात. त्या यथाकाल सुप्रसिद्ध कवयित्री होणार याची पूर्वचिन्हे ह्या काव्यसंग्रहात दिसतात. प्रत्येक कवितेचे वैशिष्ट्य त्यांनी प्रस्तावनेत सांगून प्रस्तावनेत त्यांच्या 'माणुसकीची शाळा' या अप्रतिम कवितेच्या काही महत्त्वाच्या ओळी उधृत केल्या आहेत. त्या अशा :-

ज्ञानी बनून जायची
पोरा झाली होती घाई
पण माणूस जगाचा
तो शिकलाच नाही
माणूसपणा शिकवाया
कुठली शाळा शोधू आता?

पनवेलच्या प्रसिद्ध लेखिका डॉ. ॲड. प्रार्थना सदावर्ते आणि त्यांचे सासरे स. दि. तांबोळी यांच्याही प्रस्तावना या काव्यसंग्रहास लाभल्या आहेत. हे या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्य आहे. श्री. तांबोळी यांच्या प्रस्तावनेतील अत्यंत महत्त्वाचे वाक्य अधृत केल्याशिवाय राहवत नाही. ते असे- ''तिच्या प्रत्येक कवितेच्या अंतिम चरणातून, हळूच डोकावणाऱ्या गुलाब कळीसारखं एक गोड्स तात्पर्य : तिच्या मनांतला आंतरकप्पा उलघडून दाखवतं आणि ते तात्पर्यही अगदी आवेशहीन. अगदी घरगुती कणीदार रवाळ साजूक तुपासारखे!'' अनघा तांबोळींचे अभिनंदन!

## डॉ. उल्हास कोल्हटकर यांचे 'आला क्षण, गेला क्षण' प्रकाशित

डोंबिवलीचे डॉ. उल्हास कोल्हटकर हे एक चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व आहे. डोंबिवलीतील अनेक सामाजिक साहित्यिक संस्थांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. संगीत, योग, पर्यटन, लेखन, वक्तृत्व हे त्यांचे आवडीचे विषय आहेत. बाल आरोग्य, बाल मानसशास्त्र, योग, झेन तत्त्वज्ञान, शिक्षण, जीवनशैली वैद्यक पर्यायी वैद्यक, वेळव्यवस्थापन इ. विषयांवर त्यांची आजवर २६ पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. 'आला क्षण, गेला क्षण' हे त्यांचे २७ वे पुस्तक (पृ.११५ मूल्य रू.३००/-) नुकतेच प्रकाशित झालेले आहे.

## काळावर लिखाण करणारे थोर विचारवंत ठरतात.

डोंबिवलीतील रोटरी भवनमध्ये या अप्रतिम पुस्तकाचे प्रकाशन सुप्रसिद्ध संगणक तज्ञ डॉ. उदय निरगुडकर यांच्या हस्ते झाले. ते याप्रसंगी म्हणाले, ''नोबेल पुरस्कार, मिळविणाऱ्या लेखकांपैकी सुमारे १२ लेखकांच्या

पुस्तकांचा १ पाया 'काळ' हाच होता. कारण जे काळावर लिखाण करतात. तेच थोर विचारवंत ठरू शकतात. डॉ. उल्हास कोल्हटकर यांनी 'काळ' या विषयावर तीन पुस्तके लिहिली आहेत. (रहस्य वेळ व्यवस्थापनाचे 'स्मार्टटाईम' ही पूर्वीची दोन) त्यांचे कार्य खरोखरच उल्लेखनीय आहे. ज्येष्ठ पत्रकार संजीव लाटकर, राजीव खांडेकर, श्रीराम शिधये, प्रख्यात चित्रकार सतीश भावसार, नवचैतन्य प्रकाशनाचे शरद मराठे इ. महनीय व्यक्ती समारंभास उपस्थित होत्या.

डॉ. निरगुडकर पुढे म्हणाले, ''जगात वेळेचे महत्त्व या विषयावर संशोधनाला सुरुवात झाली आहे, कारण वेळेचे महत्त्व सर्वांनाच कळू लागले आहे. काळाचा शोध प्रत्येक धर्माच्या मुळाशी जोडलेला आहे. माणूस क्षणाक्षणानुसार बदलत जगला म्हणूनच तो हजारो वर्षे पृथ्वीतलावर टिकू शकला. त्याचबरोबर तंत्रज्ञानाचाही मानवी जीवनावर मोठा परिणाम झाला असून तंत्रज्ञानाने सर्व जीवन व्यापले आहे. तरी ही स्वतःच्या व्यक्तिगत जीवनात व्यवस्थापन सूत्रांची उणीव प्रत्येकाला भासते, याचा आपण अभ्यास केला पाहिजे म्हणूनच वेळेचा सदुपयोग करण्यासाठी कोल्हटकरांचे हे पुस्तक निश्चितच उपयुक्त ठरू शकेल.''

**पुस्तकाचे अंतरंग**

टाईम मॅनेजमेंटची सुवर्णसूत्रे सांगणाऱ्या या पुस्तकांतील आर्टपेपरवर काढलेली उत्कृष्ट चित्रे सुप्रसिद्ध चित्रकार सतीश भावसार यांनी काढलेली आहेत. या चित्रांमुळे विविध सुवचने (उदा. 'फुलपाखरू क्षण मोजते, महिने नाही आणि मग त्याला पुरेसा वेळ मिळतो–रविंद्रनाथ टागोर, गृहिणीच्या वेळेची बचत म्हणजे कुटुंबाच्या वेळेची बचत, मनोवृत्ती बदलाल तर वेळ बदलेल आणि वेळ बदलली तर काळ बदलेल. यशस्वी उद्योगाचा ल.सा.वि.म्हणजे उत्तम वेळ व्यवस्थापन आणि उत्तम वेळ व्यवस्थापनाचा म.सा.वि. म्हणजे यशस्वी व समाधानी आयुष्य!') मनात ठसतात. म्हणूनच मलपृष्ठावरील छापलेला विचार 'वेळ' खरे म्हणजे जगातील सर्वात महागडी चीज! तिचे मूल्य अनंत! पण बऱ्याच वेळा बऱ्याच जणांच्या ती खिगणतीत ही नसते! क्षणाक्षणाला सांडून जाणाऱ्या या वेळेचे यशस्वी व्यवस्थापन म्हणजेच यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली! अत्यंत बोलकी झालेली आहेत.

उत्कृष्ट पुस्तकाच्या निर्मितीबद्दल लेखक डॉ. कोल्हटकर, चित्रकार सतीश भावसार व प्रकाशक शरद मराठे यांचे अभिनंदन!

**मासिक मुक्त शब्द**

मे २०१० मध्ये 'मुक्त शब्द' हे एक दर्जेदार मासिक सुरू झाले आहे. संपादक आहेत यशोधन (येशू) पाटील, ए/२०३, जनकल्याण, वझिरा नाका, बोरिवली (प.), मुंबई–४०००९१. पत्रव्यवहाराचा पत्ता आहे : शॉप नं.२/३, क्रेस्ट अपार्टमेंट, वझिरा नाका, मुंबई–४०००९१. अंकाचे मूल्य रु.३०/– (वा.व.रु.४९०/–) तीन वर्षासाठी रु.१०५०/– व सहा वर्षांची रु.१९००/– आहे.

आता माझ्यासमोर मासिकाचा ५ वा अंक आहे. या अंकात सर्वश्री नामदेव ढसाळ (कविवर्य नारायण सुर्वे यांची साहित्यिक भूमिका : काही संदर्भ), जी. के. ऐनापुरे, प्रशान्त बागड, उमा वि. कुलकर्णी ('घरपर्यंतचा रस्ता' या वैदेही यांच्या मूळ कथेचा सौ. कुलकर्णी यांनी केलेला अनुवाद) शंतनू कु. पोतदार (तूर्तास! या दास् वैद्य यांच्या कवितांचा घेतलेला परामर्श) इ.चे दर्जेदार साहित्य आहे. अंक संग्राह्य आहे.

संस्थेचे शब्द प्रकाशनही आहे. त्यांच्यातर्फे आजवर ४८ पुस्तकेही प्रकाशित झालेली आहेत. उपरोक्त अंकात २/४ निवडक पुस्तकांच्या जाहिराती दिलेल्या आहेत. या जाहिरातीतून प्रसिद्ध झालेला मजकूर असाः–

---

माणसाला अपेक्षा संतुष्ट राहू देत नाहीत.

**आँधी** – ले. गुलजार (अनु विजय पाडळकर) गुलजार त्यात म्हणतात, ''आँधी चित्रपटाची पटकथा लिहीत होतो, तेव्हा कमलेश्वरांबरोबर दुसराच एक चित्रपट निर्माण करण्याची बैठक झाली. पुढे तो चित्रपट 'मौसम' या नावाने प्रदर्शित झाला. बैठका या चित्रपटासाठी व्हायच्या आणि चर्चा सहज दुसऱ्या चित्रपटाकडे वळायची. हळूहळू आम्ही दोन्ही चित्रपटांची एकदमच चर्चा करू लागलो. शेवटी हे ठरले की कमलेश्वरांनी या कथा–कल्पनांवर आपल्या पद्धतीने कादंबऱ्या व मी माझ्या पद्धतीने पटकथा लिहावयाच्या. त्यांच्या कादंबऱ्यांतून मला काही मुद्दे मिळतील. माझ्या पटकथेतून त्यांना काही गोष्टी!''

डॉ. हरिश्चंद्र थोरात यांच्या 'कादंबरी एक साहित्यप्रकार' या पुस्तकावरील समीक्षक वसंत पाटणकर यांचा अभिप्राय असाः ''कोणत्याही सांस्कृतिक उत्पादनांप्रमाणे साहित्य प्रकारही विशिष्ट विश्वभानातून अस्तित्वात येतात. हे विद्यमान अर्थातच समाजसेवक– सांस्कृतिक परिस्थितीच्या संदर्भात निर्माण झालेले असते. साहित्य प्रकारांची अवस्थांतरे होतात. संस्कृतीच्या सीमारेषा ओलांडून ते प्रवासही करू शकतात आणि त्यांचा अंतही होऊ शकतो.

या वस्तुस्थितीचे सखोल भान ठेवूनच 'कादंबरी : एक साहित्यप्रकार' या ग्रंथाने कादंबरी या साहित्यप्रकाराचा सिद्धान्तव्यूह मांडण्याचे आव्हान स्वीकारले आहे. कांदबरीच्या आशयसंबद्ध स्वरूपाविशेषांचे आकलन आणि कादंबरीच्या रूपसंबद्ध विशेषांचे विश्लेषण या दोन्ही दिशांनी हा ग्रंथ प्रवास करतो. या दोन्ही दिशांनी हा ग्रंथ प्रवास करतो. या दोन्ही दिशा एकमेकींना परस्परपूरक होत अखेरीस एकत्र येतात.

आधुनिक युग आणि लोकशाही व्यवस्था यांच्याबरोबर जन्माला आलेल्या व प्रबोधनाच्या परंपरेशी नाते सांगणाऱ्या कादंबरी या खुल्या साहित्य प्रकाराच्या साहित्यशास्त्राची मांडणी करू पाहणारा हा ग्रंथ आहे. तो मराठीतील कादंबरी विषयक विचाराला, चर्चेला नवे परिमाण प्राप्त करून देईल अशी खात्री वाटते.

डॉ. हरिश्चंद्र थोरात हे आधुनिक साहित्यसिद्धांताचे आणि कादंबरीचे एक अव्वल दर्जाचे अभ्यासक म्हणून मराठीमध्ये प्रसिद्ध आहेत. या दोन्ही विषयांवरील त्यांच्या चिंतनाचा मराठी वाचकाला परिचय आहे.

आत्माराम लोमटे यांच्या 'आलोक' व 'इडा पीडा टळो' या कथासंग्रहांविषयी अनुक्रमे भा. ल. भोळे व रंगनाथ पठारे या साहित्यिकांच्या प्रतिक्रिया अशाः– आलोक तुम्हाला ग्रामीण जीवनाचा अस्सल अनुभव आहे आणि त्याला कथात्म रंगरूप देऊन तमाम तपशीलासह वाचकांसमोर उभे करण्याची निवेदन शैलीही लाभली आहे. गतकाळाचं गौरवीकरण करत गळा काढण्यात तुमची कथा रमत नाही आणि 'आज आणि आत्ता'ला साक्षात भिडते ही गोष्ट मला महत्त्वाची वाटते. 'ग्रामीण कथा' लिहिण्याच्या नावाखाली किस्सेबाज किंवा बखवखलेली कथानकच मोठ्या प्रमाणात देण्याची परंपरा तुमच्या कथेन स्पष्टपणे नाकारली आहे. कारण ज्या जीवनाविषयी तुम्ही लिहिता त्याबद्दल तुम्हाला जिवंत आस्था आहे.

**इडा पीडा टळो**

आत्माराम लोमटे यांच्या कथा या आजच्या उद्ध्वस्त होत चाललेल्या ग्राम समाजातील कोसळणीच्या कथा आहेत. त्यांच्या कथांतील दुःखाच्या स्फोटाचे स्वर आपले अंतःकरण घुसळून टाकतात. या दुःखांच्या मिती, रीती आणि त्यांची घतना यांच जडत्व आपल्याला खिळवून, बांधून टाकतं.

मानवी समूहांचं खचून जाणं या खेड्यांमधल्या आजच्या भीषण वास्तवाचं अत्यंत भेदक चित्र लोमटे यांच्या कथांमधून उभ राहतं. या कथांच्या दिर्घत्वानं, त्यांच्या

---

अपेक्षा ठेवली की ती आणखी वाढते.

समूह केंद्री असण्यानं त्यांत भरच पडते.

### बाबूलाल नाईककृत 'अश्रू सातपुड्याचे'

श्री. बाबूलाल नाईक (लेखक व प्रकाशक, ललित प्रकाशन, ४०, याहा भोगी, रामनगर, शहादा, ता. शहादा, जि. नंदूरबार) या आदिवासी कार्यकर्त्याचे हे ('अश्रू सातपुड्याचे') हृदय पिळवटून टाकणारे , अस्वस्थ करणारे पुस्तक (पृ.२९४, मूल्य २७५/-) जून २०१० मध्ये प्रकाशित झालेले आहे. सातपुड्यातील आदिवासी जनतेचे वर्णन करताना नाईक म्हणतात, ''पाळण्याची दोरी जिच्या हाती तीच विविध रोगांनी ग्रस्त अशी भूमी. वीतभर पोट भरायला परमुलखात झुंडांच्या झुंडी भटकणाऱ्यांची भूमी. कोवळ्या बालकांचे प्रेत खांद्यावर घेवून शेकडो मैल पायी चालणाऱ्यांची भूमी. श्वास बंद होवून काही क्षणातच शेकडो कोवळी बालके स्मशानात गाडली जातात अशी ही विचित्र भूमी. चितेला आग लावणारे टपून बसलेलेच असतात. खड्डा खोदून तयार आहे अशा विचित्र नियतीची ही भूमी..''

''..सातपुड्याने धारण केलेल्या डोंगरांमध्ये, दऱ्यांमध्ये आयुष्यभर मरणाचे ओझे घेऊन फिरतो, भटकतो. या दरीतून त्या दरीत. या डोंगरावरुन त्या डोंगरावर..अन्न कणांच्या शोधात. पण अन्नकण त्यांच्या नशिबी नाही..'' असे हे सारे वर्णन भेदक व भयावह आहे. स्वातंत्र्य मिळवून ६३ वर्षे झाली असून काही लाखोंची ही स्थिती शासनाने युद्धपातळीवर काम करून त्यांच्या या जीवनात बदल घडवून आणावा. प्रत्येकाने हे पुस्तक वाचावेच.

### डॉ. बाळ बेंडखळे लिखित 'भुयार' प्रकाशित

वाघ वाट्टेल ते खात नाही. अनेक वेळा तो त्याच्या वाटेने निघून जातो. वाघांवर हल्ले होण्याच्या, त्याला मारण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत म्हणजे माणूस हिंस्त्र होत आहे. या तुलनेत वन्यजीव, प्राणी मात्र मनुष्याच्या सहवासात माणसाळत आहेत. मनुष्याच्या सहवासात कायम राहीले तर प्राणी त्याच्या चौकटबद्ध जीवनप्रणालीत मनुष्यांना घेतो. 'भुयार' या पुस्तकाच्या माध्यमातून हेच स्पष्ट होते असे प्रतिपादन ज्योतिषशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ. सुधाकर महालपूरकर यांनी दि. २७.५.१२ रोजी डोंबिवली येथील टिळकनगर विद्यामंदिराच्या पेंढरकर सभागृहात केले.

प्रसंग होता डोंबिवली येथील डॉ. बाळ बेंडखळे यांच्या 'भुयार' या आगळ्या वेगळ्या पुस्तक प्रकाशनाचा. निसर्गात भ्रमंती करण्याचा लहानपणापासूनचा मनस्वी छंद. तरुणाला लाजवेल असा त्यांचा उत्साह ७५ वर्षांच्या तरुणाने आतापर्यंत ८० च्या आसपास भुयारे, नद्या आणि २४५ च्या किल्ल्यांची भटकंती केलेली आहे. गो. नी. दांडेकरांचे ते पट्टशिष्य शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरेंच्या शिवसृष्टी निर्मितीत त्यांचा सहभाग होता. भुयारांशी मैत्री करणाऱ्या या अवलियाने विविध भुयारांच्या अंतरंगाची नवलाई अत्यंत हळुवारपणे उलगडून दाखविली आहे. वाचकाला रोमांचित करणारे विलक्षण अनुभव या अनोख्या पुस्तकात त्यांनी केले आहे. चैतन्य ऋतु प्रकाशन या त्यांच्याच प्रकाशन संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केलेले आहे. प्रसिद्ध साहित्यिक दिवाकर गंधे, प्रा. सुनील हिंगणे यांची भाषणे आणि डॉ. बेंडखळे यांचे मनागत या प्रसंगी झाले. कार्यक्रमास मोठा श्रोतृवर्ग उपस्थित होता.

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

# अनुष्टुप ज्ञानेश्वरी

काळाच्या ओघात जे टिकून रहाते ते 'अक्षर' होय. साक्षात श्रीकृष्णाने कुरुक्षेत्रावर सांगितलेली भगवतगीता आणि तिचा मराठीत अर्थ स्पष्ट करणारा 'श्री ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ अशा 'अक्षर' साहित्याची उदाहरणे आहेत. श्री ज्ञानेश्वर महाराजांनी मराठी भाषेवर केलेले जे उपकार आहेत त्यांचे महत्त्व सामान्य माणूस काय सांगणार? मूळ संस्कृत भाषेत असणाऱ्या श्लोकांचे मराठीत रूपांतर व भाष्य श्री ज्ञानेश्वरीमध्ये आहे. पण भाषेच्या प्रवासाच्या काळात ज्ञानेश्वरीतील ही भाषा कळायला अवघड होत गेली. त्यामुळे श्री ज्ञानेश्वरीतील भाषा सुगम करण्याचे प्रयत्नही एकीकडे चालू राहिले.

श्री ज्ञानेश्वरीचे अभ्यासक व तत्त्वचिंतक प्र. सि. मराठे यांनी दोन अडीच वर्षे परिश्रम घेऊन असाच एका प्रयत्न केला आहे. 'सुबोध अनुष्टुप ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ त्यांनी सिद्ध केला. संत साहित्य आणि ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ यांचा अभ्यास मराठीत अव्याहतपणे चालू आहे व चालू राहणार आहे. या दृष्टीने श्री. मराठे यांचे हे योगदान फार महत्त्वाचे ठरणारे आहे; कारण अनुष्टुप छंदात आता या नऊ हजार ओव्या मराठी अभ्यासकांना उपलब्ध झाल्या आहेत.

आपल्या या कामामध्ये भगवान श्रीकृष्णांची कृपा आणि माऊलींचे आशीर्वाद आहेत. अशी श्री. मराठे यांची भावना आहे. अतिशय सश्रद्ध असल्याने त्यांच्या या कर्तृत्वात भक्तीचा अनमोल ओलावा आहे. श्री ज्ञानेश्वरीचे वेगळेपण सांगताना श्री. मराठे म्हणतात, ''भगवद्गीतेवरील इतर टीका ग्रंथांच्या तुलनेत ज्ञानेश्वरी या ग्रंथाचे एक वेगळेच वैशिष्ट आहे. भगवद्गीतेत सर्व वैदिकत्त्व ज्ञानाचे सार शब्दात साठवले आहे, परंतु शब्दाच्याही पलीकडचा असा जो आशय आहे की जो केवळ योग साधनेनेच अनुभवायचा असतो. तो ज्ञानोबांनी स्वतः सिद्धयोगी असल्यामुळे सामान्यांसाठी शब्दात वर्णन करण्याचा प्रयत्न केला आहे.'' प्रास्ताविक पृष्ठांमधील श्री. प्र. सि. मराठे यांचा 'ज्ञानोबांचा दिव्य संदेश'(पृष्ठ १३ ते २९) हा लेख अतिशय अभ्यासपूर्ण असा झाला आहे. याशिवाय या प्रास्ताविक पृष्ठांत दिवाकर अनंत घैसास, डॉ. रविन थत्ते, ज्योतिर्भास्कर जयंतराव साळगावकर व ज्योती ढवळे यांचे प्रास्ताविक लेखन आले आहे. या ग्रंथची रचना पानाच्या डाव्या बाजूला ज्ञानेश्वरीतील ओव्या, त्याखाली अर्थ आणि पानाच्या उजव्या बाजूला श्री. मराठे यांची अनुष्टुप छंदातील रचना अशी आहे.

अनुष्टुप छंदाची सविस्तर माहिती मात्र ग्रंथामध्ये यावयास हवी होती असे वाटते. श्री. प्रस सि. मराठे यांची भाषा अतिशय सुबोध व एक वेगळीच शक्ती अंगीभूत असणारी आहे. त्यांच्यावर असणाऱ्या परमेश्वराच्या कृपेमुळे या छंदावर असणारी त्यांची पकड लक्षणीय आहे. अनुष्टुप छंदाबद्दल असे सांगितले जाते की, ते अक्षरगण वृत्त नाही, मात्रावृत्त नाही आणि पूर्णपणे छंद ही नाही. हा छंद प्रथम क्रौंच वधाच्यावेळी वाल्मीकी ऋषींच्या मुखातून प्रथम बाहेर पडला.

ज्ञानेश्वरीच्या ज्या अनेक प्रकारच्या संहिता मराठी साहित्यात आहेत त्यात पडलेली ही महत्त्वपूर्ण भर आहे. यात वाद नाही. अनुष्टुपासारख्या छंदात ओव्यांची पुनर्रचना करणे हे कष्ट साध्यच म्हणावयास हवे. ग्रंथ निर्मितीच्या मूल्यांच्या दृष्टीनेही ग्रंथ चांगला झाला आहे.

- श्रीमत सुबोध अनुष्टुप ज्ञानेश्वरी : मूळ संहिता व गद्य निरुपणासहित
- मराठे प्र. सि.
- मुंबई, केशव भिकाजी ढवळे, २०१२
- पृष्ठे ३०,८८०
- मूल्य रुपये ८००/- फक्त

**– मोहन पाठक**

रंगांचा संग झाला तरी त्याचा परणिाम आकाश स्वतःवर होऊ देत नाही.

# आंतरराष्ट्रीय बाल विज्ञान-गणित मेळावा

*दिशाचे लखक, शास्त्रज्ञ व विज्ञान शिक्षणात भरीव योगदान देणारे डॉ. सुधाकर आगरकर यांच्या पुढाकाराने अत्यंत यशस्वी ठरलेल्या विशाखापट्टण येथील मेळाव्याचा वृत्तांत. डॉ. आगरकर यांचे याबद्दल दिशातर्फे खास अभिनंदन-संपादक*

२०१२ हे भारतात गणित वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. त्याचे औचित्य साधून विशाखापट्टणम येथे बालकांसाठी विज्ञान-गणित मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. शाळकरी विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून या मेळाव्याची आखणी केली होती. शालेय स्तरावरील कोणत्याही तत्त्वावर आधारित प्रदर्शनीय वस्तू ठेवण्यास या मेळाव्यात मुभा होती. या प्रदर्शनीय वस्तूंचे सोयीसाठी ऊर्जा, पर्यावरण, अन्न आणि आरोग्य, दैनंदिन विज्ञान आणि शालेय गणित असे पाच विभाग पाडले होते. यांपैकी कोणत्याही एका विभागासाठी विद्यार्थ्यांना प्रकल्प करायचा होता. एका प्रकल्पाबरोबर तीन विद्यार्थी आणि एक शिक्षक अशा चौघांना विशाखापट्टणमला पाचारण करण्यात आले होते. त्यांच्या जाण्यायेण्याचा खर्च त्यांनी वैयक्तिक किंवा त्यांच्या संस्थेने करावयाचा होता. स्थानिक खर्चाची सर्व जबाबदारी यजमान शिक्षण संस्थेने घेतली होती. आमच्या आव्हानाला सकारात्मक प्रतिसाद देऊन एकूण ६४ प्रकल्प या मेळाव्यात समाविष्ट झाले होते. यात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, ओरिसा, केरळ, तामीळनाडू या राज्यांतील शाळांचा समावेश होता. त्याखेरीज हाँगकाँग, थायलंड, इटली आणि दुबई येथील शाळांनी देखील आपले प्रकल्प आणले होते. त्यामुळे या विज्ञान मेळाव्याला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले होते. नोव्हेंबर ९ ते ११ या तीन दिवसात अख्खे विशाखापट्टणम विज्ञान आणि गणितमय झाले होते. त्याचे श्रेय जाते ते अर्थातच श्री प्रकाश विद्यानिकेतन या संस्थेला.

श्री प्रकाश विद्यानिकेतन ही खाजगी क्षेत्रातील विशाखापट्टणम शहरातील शैक्षणिक संस्था असून ती या शहरात इंग्रजी माध्यमाच्या ५ शाळा चालविते. या संस्थेचे संचालक श्री वासू प्रकाश हे एक दूरदृष्टीचे गृहस्थ असून आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याचा ते सतत प्रयत्न करीत असतात. ज्ञानी व्यक्तीला शाळेत बोलविणे आणि त्यांची विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने आयोजित करणे हा तर त्यांचा छंदच आहे. डिसेंबर २०११ मध्ये रामानुजन पारितोषिक घेण्यासाठी मी विशाखापट्टणमजवळच असलेल्या रामचंद्रपूरम या गावी गेलो होतो. ती संधी साधून त्यांनी मला त्यांच्या संस्थेत विद्यार्थ्यासाठी एक सत्र घेण्याची विनंती केली. त्या सत्रानंतर अनौपचारिक चर्चेत मी त्यांना चीनमधील किशोरांसाठी असलेल्या विज्ञान प्रदर्शन स्पर्धेबद्दल सांगितले. त्याचबरोबर या स्पर्धेत ठाणे येथील ए.के. जोशी शाळेतील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दलही सांगितले. ही संधी जास्त मुलांना उपलब्ध करून देता येईल का? असा प्रश्न त्यांनी निर्माण केला. त्यावर ''असे करावयाचे असेल तर आपल्यालाच विज्ञान स्पर्धा आयोजित करावी लागेल. पण ते खर्चिक काम होईल'' असे उत्तर मी त्यांना दिले. पडेल तेवढा खर्च आपण करू या पण एक आंतरराष्ट्रीय स्पर्धा आपण घेऊच असा निर्धार त्यांनी केला. डिसेंबर २०११ च्या चौथ्या आठवड्यात निर्णय झाला आणि नोव्हेंबर २०१२ च्या पहिल्या आठवड्यात प्रत्यक्ष मेळाव्याचे आयोजन झाले.

स्पर्धेत यश अपयशाचीच काळजी जास्त घेतली जाते. त्यातून फारसे शिक्षण होत नाही. याऊलट सहकार्यातून ज्ञानवृध्दी होते असे माझे मत आहे. म्हणून मी स्पर्धेचे आयोजन न करता मेळाव्याचे आयोजन करावे असे

सुचविले आणि हे त्यांनी लगेच मान्यही केले. अशा पद्धतीने First International Children's Science and Maths Festivel असे मेळाव्याचे नामकरण करण्यात आले. प्रत्यक्ष मेळाव्याला सणाचेच स्वरूप आले होते. याचे कारण आयोजकांचा दृष्टिकोन तसा होता. याखेरीज आणखी एक सूचना मी केली. विज्ञान प्रदर्शनाच्या निमित्ताने वेगवेगळ्या ठिकाणचे शिक्षक आणि विद्यार्थी एकत्र येतात. त्यांचा बराचसा वेळ आपल्या प्रकल्पाची माहिती सांगण्यातच जातो. काही मंडळी वेळ काढून दुसऱ्याचा प्रकल्प बघतात. तरीही त्यांच्या ज्ञानात फारसा फरक पडत नाही. म्हणून या मेळाव्यात नामवंत व्यक्तींचे प्रयोगदिग्दर्शन असावे असे मी सुचविले. ते देखील आयोजकांनी मान्य केले. तीनही दिवसातील रोज जेवणापूर्वीचा वेळ अशा प्रयोग दिग्द्दर्शनासाठी आणि जेवणानंतरचा वेळ प्रकल्प सादरीकरणासाठी अशी वेळेची विभागणी करण्यात आली. विद्यार्थ्यांचे मनोरंजन करून त्यांना ज्ञान देऊ शकणाऱ्या व्यक्तीची निवड करण्याची जबाबदारी माझ्यावरच पडली. त्यानुसार या क्षेत्रातील नामवंत व्यक्तीची मी निवड केली. त्यांच्या जाण्यायेण्याचा आणि राहण्याखाण्याचा खर्च आयोजकांनीच केला.

प्रयोगदिग्दर्शन करण्यासाठी पाचारण केलेल्या पहिल्या व्यक्तीचे नाव होते डॉ. जांचाय यिंगप्रयून (Janchai Yingprayoon). हे गृहस्थ बँकाक येथील एका आंतरराष्ट्रीय महाविद्यालयाचे उपसंचालक असून वेगवेगळे वैज्ञानिक खेळ बनविण्यात त्यांचा हातखंडा आहे. विज्ञान अध्यापनात खेळण्यांचा उपयोग कसा करता येतो या विषयावर एक आंतरराष्ट्रीय परिषद त्यांनी मागच्याच वर्षी थायलंड मधील पटाया या शहरात आयोजित केली होती. त्यांनी आपल्याबरोबर अशा अनेक खेळण्यांची पोतडीच आणली होती. काही खेळणी तर त्यांनी वेळेवर विद्यार्थ्यांकडून करून घेतली. त्यांच्या खेळण्यांशी खेळण्यात केवळ मुलेच नाहीत तर मोठी माणसेदेखील दंग झाली.



**जाँच्याय यांचे मनोरंजक व ज्ञानवर्धक सत्र**

मेळाव्यासाठी पाचारण केलेली दुसरी व्यक्ती होती डॉ. जिम्मी वोंग (Jimmy Wong). हे गृहस्थ हाँगकाँगमधून आले असून तेथील एका नवनिर्मिती संस्थेचे ते संचालक आहेत. शाळेतील हुशार विद्यार्थ्यांना निवडून त्यांच्यातील नवनिर्मितीची आस वृध्दिंगत करण्यसाठी ते प्रयत्न करीत असतात. आपल्या व्याख्यानात त्यांनी नवनिर्मितीचे तत्त्व सांगून अनेक उदाहरणे दिली. त्यांतील काही उदाहरणे प्रत्यक्ष कृतीद्वारे तर काही उदाहरणे चित्ररूपाने त्यांनी दाखविली.




**डॉ. वोंग प्रयोग दाखवीत असताना**

पुष्पमित्र भार्गव हे भारतीय विज्ञानातील प्रसिध्द नाव. हैद्राबाद येथील सेंटर फॉर सेल्युलर आणि मॉलेक्युलर

बॉयोलॉजी या संस्थेची त्यांनी स्थापना केली. आमच्या विनंतीला मान देऊन वयाच्या ८४ व्या वर्षी हैदराबादवरून ते विशाखापट्टणमला आले. विज्ञानाच्या प्रगतीतील विविध टप्पे त्यांनी उलगडून दाखविले. त्याचबरोबर विज्ञानाच्या प्रगतीला गणिताने कसा हातभार लावला हे देखील स्पष्ट केले. टेरी रस्ट (Terrie Rust) नावाच्या एक अमेरिकन शिक्षिका सध्या हैद्राबाद येथील क्रेया शिक्षण संस्थेत काम करीत आहेत. त्यांना देखील विद्यार्थ्यांशी संवाद करण्यास बोलाविण्यात आले. ''२१व्या शतकातील शास्त्रज्ञ'' असा विषय त्यांनी घेतला होता. शास्त्रज्ञांबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात कोणत्या कल्पना असतात हे विशद करून या विदुषीने २१ व्या शतकातील शास्त्रज्ञांच्या शिरावर असलेल्या जबादाऱ्यांचे वर्णन केले. तिची एक शास्त्रज्ञ असलेली मैत्रिण सध्या अँटार्टिकामध्ये कार्यरत आहेत. प्रगत तंत्रज्ञानाच्या मदतीने तिने आपल्या मैत्रिणीशी संपर्क साधला. त्या बाईने अँटार्टिकातील चित्रे दाखविली. त्याचबरोबर आपल्या संशोधनाची माहिती देखील तिने दिली. हे सगळे विद्यार्थ्यांसाठी स्वप्नांसारखेच होते.



**डॉ. रस्ट विद्यार्थ्यांशी बातचीत करीत असताना**

आपले ब्रम्हांड अनेक वैविध्यपूर्ण बाबींनी भरलेले आहे. या ब्रम्हांडाचे कुतूहल लहानथोर सर्वांनाच असते. हे कुतूहल शमविण्यासाठी नेहरू तारांगण मुंबई येथील प्रकल्प समन्वयक श्री. सुहास नाईकसाटम यांना पाचारण करण्यात आले होते. पॉवरपॉईंटच्या मदतीने त्यांनी ब्रम्हाडाची सैर घडवून आणली. वेगवेगळ्या ग्रहताऱ्यांबद्दल त्यांनी एवढी नवनवीन माहिती दिली की सर्व विद्यार्थी आणि शिक्षक अवाक होऊन ते सर्व ऐकत राहिले. गणित हा तसा रुक्ष विषय. गणिताबद्दल अनेक विद्यार्थ्यांना नावडच असते. ती काढून टाकण्याचा मी प्रयत्न केला. त्यासाठी गणितज्ज्ञांच्या जीवनातील घडामोडीचा अधार घेऊन गणित किती मनोरंजक आहे हे वेगवेगळ्या कथेतून दाखविण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर सागर माथ्याची उंची काढणे, ऊर्जा वस्तूमान परस्पसंबंध सिध्द करून दाखविणे अशा अनेक बाबी गणिताच्या मदतीनेच होऊ शकल्या हे देखील स्पष्ट केले. विद्यार्थ्यांकडून या कथांना चांगलाच प्रतिसाद मिळाला.

गणिताची प्रयोगशाळा ही नवीन कल्पना असून ती रुजविण्याचा प्रयत्न सुरू आहे. विजयवाडा येथील रहिवासी श्री चंद्रशेखर शास्त्री गणित प्रयोगशाळांचा विकास करून देतात. त्यातील खेळ आणि उपकरणांच्या मदतीने गणितातले अतिशय मनोरंजक प्रयोग करून दाखवितात. त्यापैकी काही कृती मेळाव्यात दाखविण्यात आल्या. या कामी शाळेतील विद्यर्थ्यांनी पुढाकार घेतला होता. दिवसभर मेळाव्यात सहभागी झाल्यावर संध्याकळी श्रमपरिहार म्हणून सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये भारतीय शास्त्रीय नृत्याबरोबरच चित्रकला, जादूचे खेळ इत्यादी अनेक बाबींचा समावेश करण्यात आला होता. त्यामुळे वेगवेगळ्या भागांतून आलेल्या विद्यार्थी आणि शिक्षकांचे मनोरंजन झाले.



आपण बनविलेल्या रोबोटचे कार्य दाखविताना शाळकरी विद्यार्थी



हाँगकाँग मधील विद्यार्थिनी प्रशस्ती पत्रक घेताना

विज्ञान–गणित मेळाव्यासाठी एकूण ६४ प्रकल्प आले होते. वर सांगितल्याप्रमाणे त्यांची ऊर्जा, पर्यावरण, अन्न व आरोग्य, दैनंदिन जीवन आणि गणित अशा ५ गटांत विभागणी करण्यात आली होती. प्रत्येक गटातील पहिल्या दोन स्पर्धकांना पारितोषिक देण्यात आले. त्याचबरोबर प्रत्येक विद्यार्थ्यांला सहभागाचे प्रमाणपत्र (Participation Certificate) देण्यात आले. आंतरराष्ट्रीय स्तरावरचे विज्ञान गणित मेळाव्याचे अयोजन करण्याचा हा पहिलाच प्रयत्न होता. या प्रयत्नाला चांगला प्रतिसाद मिळाला. मेळाव्याचे आयोजनदेखील श्री. प्रकाश विद्यानिकेतनने उत्तम तऱ्हेने केले. या निमित्ताने सुमारे २५० विद्यार्थी आणि शिक्षकांना परस्पराशी आंतरक्रिया करता आली. विशाखापट्टणमधील शिक्षक, विद्यार्थी, पालक यांना विज्ञान व गणित शिक्षणाच्या क्षेत्रातील प्रसिध्द व्यक्तींशी संपर्क साधून त्यांची मते जाणून घेता आली. तज्ज्ञ व्यक्तीपैकी अनेकांच्या मुलाखती वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाल्या. त्यामुळे सुमारे आठवडाभर विशाखापट्टणम शहर विज्ञान आणि गणितमय झाले होते. अशा प्रकारचे आंतरराष्ट्रीय मेळावे मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्याची गरज आहे.

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे – ४२१२०४

●●●

## मेंदू आणि मशीन

संगणकावर गेम्स खेळण्यासाठी तुम्ही मेंदूचा वापर करत असलात, तरी हात चालवावे लागतातच; पण अमेरिकेतल्या सॅन्फ्रान्सिस्कोमधील 'इमोटिव्ह' नावाच्या कंपनीने एक खास प्रणाली विकसित केली आहे. जिच्यामुळे आपल्या विचारांद्वारे आपण गेम्स खेळू शकतो. यामध्ये एक उपकरण आपल्या डोक्यावर बसवले जाते. त्यात सोळा संवेदक असतात. जे 'इलेक्ट्रोएन्सेफॅलोग्राफी' नावाच्या प्रक्रियेचा वापर करून आपल्या मेंदूतील सूक्ष्म हालचाली टिपतात आणि विचारांचा वेध घेतात. या हालचालींचा वापर करून आपण संगणकावर गेम्स खेळू शकतो. अर्थात, ही केवळ सुरूवात असून, भविष्यात अशा प्रकारे मेंदू आणि मशीनचा वापर करून संकल्पना कंपनीतर्फे सादर केल्या जाणार आहेत.

प्रेमाचं भक्तीत रूपांतर झालं नाही, तर केवळ शरीर आकर्षण उरते.

# यज्ञ मीमांसा

*यज्ञ या संकल्पनेवर प्रकाश टाकणारा लेख – संपादक*

### यज्ञाचा अर्थ

यज्ञाचा मुख्य अर्थ काय आहे याचा विचार करणे आवश्यक आहे. 'यज्' या धातूचे देवपूजा, संगतिकरण व दान असे तीन अर्थ आहेत. निर्भयता, ज्ञाननिष्ठा, दान, शम, दम, स्वाध्याय, तपश्चर्या, सरलता, अहिंसा, सत्य, अक्रोध, शांति, भूतदया, निर्लोभ वृत्ति इत्यादि दैवी संपत्ती जेथे असतात त्याचे नांव देव. या देवाचा सत्कार करणे, एकजूट म्हणजे त्याची संघटणा करणे आणि आत्म सर्वस्वाचे दान करणे या तीन गोष्टी जेथे होतात त्या कर्माचे नांव यज्ञ होय. सत्कार, संघटना व उपकार ही तीन लक्षणे यज्ञ संस्कृतीची आहेत.

जनतेच्या कल्याणासाठी आपल्या कर्म फळाचा त्याग करण्याची तयारी असल्यावाचून कोणताच यज्ञ होऊ शकत नाही. अशाच यज्ञाने मनुष्य उच्च होतो. यज्ञाची उत्पत्ति मनुष्याबरोबरच झाली आहे. यज्ञ प्रजेबरोबरच उत्पन्न झाला आहे. इथे प्रजा म्हणजे जे जे सृष्ट आहे ते सारे असा अर्थ अभिप्रेत आहे. थोडक्यात निर्जीव, सजीव यांची उत्पत्ती यज्ञासह झाली आहे. सृष्टी स्वभावतःच यज्ञ करीत आहे. मनुष्य मात्र आपले धर्म विषयक कर्तव्य ज्ञानपूर्वक करीत असल्याने त्याने यज्ञ देखील बुद्धी पूर्वक करणे आवश्यक आहे. सर्व जगातील स्थिर चर पदार्थ त्यांच्या त्यांच्या प्रकृतिधर्माने यज्ञ करीत आहेत.

### विश्व यज्ञ

भगवान् सूर्य नारायण प्रकाश पाडतो तो जगाच्या कल्याणासाठी, वायू सर्व जीवांना व वनस्पतीचाही प्राण आहे, तो सर्वांना जगवतो. अंतराळातील मेघ म्हणजेच प्रजापति. तो केवळ परोपकारार्थ वर्षाव करतो. द्युलोक व अंतरिक्षातील देवता यांचा स्वभावतःच यज्ञ होत राहतो. पृथ्वी सर्वांना आधार देते, ही परोपकाराची पराकाष्ठा आहे. आम्ही तिला कष्ट देतो परंतु ती आम्हाला अन्नधान्य, फळे इत्यादींनी पोषण करते. जल देवता आपल्या मधुर रसाने आमची तृप्ती करते जणू अमृतय, वृक्ष, वनस्पती, फळे, फुले देतात मनुष्याचे सुख वाढवितात. मानवासाठी सर्व भूतमात्र फार मोठा त्याग करीत आहेत. सर्व जगाकडे यादृष्टीने पाहिल्यास वैश्विक यज्ञाचा अनुभव येईल. मनुष्याच्या अस्तित्वासाठी संपूर्ण विश्वात किती त्याग होत आहे या त्यांच्या यज्ञावरच आपले अस्तित्व अवलंबून आहे. हा यज्ञ झाला नाही तर मनुष्य जीवंत राहणेही संभवनीय नाही. यज्ञावरच सर्व जगाची स्थिती अवलंबून आहे. यज्ञामुळे सर्व विश्व सुस्थितीत आहे.

### शारीरिक यज्ञ

शारीरिक धारणा ही पूर्णपणे यज्ञावरच अवलंबून आहे. डोळे पाहातात शरीराच्या हितासाठी, कान ऐकताहेत, नाक वास घेतात, हात कार्य करतात, पाय शरीराला सर्वत्र घेऊन जातात, पोट अन्न पचवून त्याचा रस बनविते आणि त्याचे रक्तमांस इत्यादित परावर्तित करते व शरीरातील अणु रेणूकडे पाठविते. थोडक्यात प्रत्येक अवयव आपआपल्या शक्तीची पराकाष्ठा करुन सर्व शरीराच्या कल्याणासाठी आपले शक्ती सर्वस्व समर्पण करीत आहेत. आत्मसमर्पण हाच त्यांचा यज्ञ होय. या यज्ञामुळेच जीवन फुलते. असा यज्ञ झाला नाही तर मरणच प्राप्त होते. शरीर हे एक छोटे

राष्ट्रच आहे. राष्ट्र हा विस्तृत मोठा देह आहे. राष्ट्रात यज्ञबुद्धी असल्यास राष्ट्राची सुस्थिती आणि राष्ट्रातील लोकांची अयज्ञाकडे प्रवृत्ती झाल्यास राष्ट्राची दुस्थिती होईल.

**राष्ट्रयज्ञ**

राष्ट्रात ज्ञानी, वीर, व्यापारादि कुशलतेने व्यवहार करणारे, श्रमोपजीवी आदि घटक आहेत. हे सारे घटक आपल्या ठिकाणची शक्ती राष्ट्रार्पण बुद्धीने वापरुन महान यज्ञ करावा. ज्ञानीयानी सर्वाना ज्ञान संपन्न करावे, शूर वीरानी आपल्या पराक्रमाने सर्वांचे रक्षण करावे, व्यापार उदीम करणाऱ्यांनी सर्वांचे पोषण करण्यासाठी झटावे. श्रमजीवीनी हरहुन्नर राहून राष्ट्रातील संपन्नता आपल्या चातुर्याने व कष्टाने वाढवावी.

असा हा राष्ट्र यज्ञ झाल्यास राष्ट्र तेजस्वी होईल. शौर्य वाढेल, संपत्तिमान होईल व उत्कृष्ट कारागिरी निर्माण होईल.

नायं लोकोऽस्ति अयज्ञस्य कुतः अन्यः कुरुसत्तम। गीता ४.३१

यज्ञ न करणाऱ्याना या लोकालाही पारखे व्हावे लागते इतर लोकाबद्दल कल्पनाच नको. अयज्वानः सनका प्रेतिं ईयुः। ऋ. १.३३.४ यज्ञ न करणारे लोक उदार असले तरी नष्ट होतात.(प्रेतिं ईयुः)

यज्ञ न करणाऱ्या मनुष्याला कोणत्याही प्रकारचे सुख प्राप्त होणे शक्य नाही. हे नीट लक्षात ठेवावे. कारण यज्ञ हा मनुष्याबरोबर उत्पन्न झाला असून तो मनुष्याचा नेहमीचा साथीदार आहे. तो मनुष्याचा सहधर्म असल्याने त्याचा त्याग करणे मनुष्याला योग्य नाही.

**गृहयज्ञ**

आपण विश्व, शरीर, राष्ट्र इथे स्वभावतः चालत असलेला यज्ञ. विचार केला तसाच तो घरोघरी कसा होत आहे हे पाहू. घरात देखील स्वार्थ त्यागाचा धडा मिळतो. आई मुलासाठी स्वार्थ त्याग करते. नवरा-बायको परस्पर आत्मसमर्पण करतात. कुटुंबातील इतर मंडळी परस्परासाठी आत्मसमर्पण करतात. कुटुंब हेच खरे गृह होय. जेथे असं आत्मसमर्पण होत नाही तेथील कुटुंबियांना गृह सौख्य मिळणे शक्य होत नाही. कारण सुख हे आत्मसमर्पण आहे. आत्मसमर्पण म्हणजे आत्मयज्ञ. त्यागानेच सुख मिळते.

प्रेमपूर्ण सुहृद, परस्परावर प्रेम, पुत्र पित्याला अनुकूल असणारा, आईशी चांगल्या मनाने वागणारा, पत्नी पतीबरोबर शांतिपूर्ण व प्रिय करणारी, भाऊ भावाचा द्वेष न करणारा, बहीण-बहीणीचे वैर न करणारी सर्वजण एकमनाने कामात लक्ष घालून परस्पर प्रेमपूर्वक व्यवहार करीत राहणारे कुटुंबच उन्नतीस पात्र होते.

या ठिकाणी गृहयज्ञ कसा करावा हे उत्तमरीतीने सांगितले आहे. नवजात बालक देवांश समजून ह्या बालकावर मातापित्यानी प्रेम करावे. पती व पत्नी एकमेकांनी परस्पर आदर करीत वागावे असा सत्कार संगतिकरण व दानात्मक यज्ञ करावा. सर्व कुटुंब सुखी करावे.

**कर्मयोग हा यज्ञच**

यज्ञासाठी केलेल्या कर्माचे मनुष्याला बंधन होत नाही. पण जो मनुष्य या व्यतिरिक्त कर्मे करतो त्यामुळे त्याला बंधन येते. म्हणून आसक्ति सोडून यज्ञासाठी कर्म कर. यज्ञासाठी केलेल्या कर्माने मनुष्य बंधमुक्त होतो. निर्दोष होतो. पण यज्ञासाठी न केलेल्या स्वार्थी कर्मामुळे मनुष्य बंधनात पडून परतंत्र होतो. येथे यज्ञ याचा अर्थ केवळ होम हवन एवढाच अभिप्रेत नाही हे आता पर्यतच्या विवेचनावरुन ध्यानात येईलच व यज्ञाचा व्यापक आशय मनुष्याच्या आचरणात आला पाहिजे.

शोक झाला की प्रलोभनाला बळी पडण्याचा धोका वाढतो.

**यज्ञापासून पर्जन्य**

अग्नौ प्रास्ताहुतिः सम्यक् आदित्यं उपतिष्ठति।
आदित्यात् जायते वृष्टिः वृष्टेः अन्नं ततः प्रजा। मनु ३.१०६

जगात चालू असलेल्या या यज्ञावरच मनुष्याचे जीवित अवलंबून आहे आणि या जागतिक यज्ञामुळेच मनुष्य जीवंत राहातो म्हणून जगाच्या कल्याणासाठी स्वतः आपल्या शक्तीने यज्ञ करणे हे मनुष्याचे कर्तव्य ठरते. मनुष्याचे आयुष्य यज्ञमय असले पाहिजे. गीतेतील यज्ञ शब्द आत्मसमर्पण रुप सामान्य यज्ञाचा वाचक आहे. द्रव्ययज्ञ तपोयज्ञ, इत्यादि यज्ञ हे सामान्य यज्ञाचेच भाग आहेत. होम हवन रुप यज्ञ या आत्मसमर्पण रुप यज्ञाचे उपलक्षण मात्र आहे.

वैदिक वांङमयात यज्ञ हा अत्यंत महत्त्वाचा व्यापक आणि विस्तृत विषय असून होम हवन हा त्याचा एक लहानसा भाग आहे. हवनाने रोगाचा नाश होतो. हवन हे एक मोठे शास्त्र असून त्याचा उपयोग निरनिराळ्या कार्यासाठी होतो. रोगनाशक, रोग प्रतिबंधक हवन आहे. त्याच प्रमाणे रोग उत्पादक व रोगवर्धक देखील हवन आहे. शत्रूच्या देशात रोगवर्धक व स्वतःच्या देशात रोग प्रतिबंधक हवन करीत. हवन वृष्टिवर्धकही आहे आणि वृष्टि नियामकही आहे. हे शास्त्र सांप्रत लुप्त झाले आहे.

गीतेतील यज्ञसंबंधी विचार केवळ होम हवन नसून– वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक व राष्ट्रीय अशा स्तरावरील कर्तव्यतेचा आहे. यज्ञापासून मेघ, मेघापासून पर्जन्य, पर्जन्यापासून अन्न हा एक प्रकारचा आत्मसमर्पण यज्ञ आहे. जलाचे आत्मसमर्पण वाफ, वाफेचे रुपांतर मेघात, मेघ वृष्टिच्या रुपाने आत्मसमर्पण करतात. त्यामुळे सर्व उभ्दिज आणि प्राणी सृष्टीचे पालन होते. थोडक्यात एकाच्या पालन पोषणासाठी दुसऱ्याचा आत्म समर्पणरुपी यज्ञ होणे आवश्यक आहे. अन्न समर्पण करुन प्राण्यांच्या जीवनाला कारण होते. प्राणी आपला प्राणभूत वीर्य व रज समर्पण यज्ञ करुन प्रजा उत्पन्न करतात म्हणून अशा यज्ञ प्रक्रियेवर जग चालले आहे. हा यज्ञ परमेश्वरी नियमाने होत असल्याने तो घडूनही कुणाला पुण्य मिळत नाही कारण हा यज्ञ ईश्वरी संकेताने होतो.

या विश्वव्यापी परमेश्वरी नियमाने अवलोकन करुन सर्वत्र परमेश्वराचे यज्ञ सूत्र कसे चालू आहे हे ध्यानात येईल. म्हणून मनुष्याने स्वेच्छेने आत्म समर्पणरुप यज्ञ करावा. हे समर्पण स्वच्छेने केल्यास पुण्यही पदरात पडते. मात्र यज्ञ न केल्याने अधोगति होते. मनुष्याला याबाबत पूर्ण स्वातंत्र्य आहे. म्हणून स्वच्छेने हा यज्ञ चालविला पाहिजे म्हणजेच आवश्यक कर्तव्य केल्यासारखे होईल. या यज्ञावरच जगाचे कल्याण अवलंबून आहे म्हणून मनुष्याने आपल्या शक्तिनिशी यज्ञ करणे योग्य ठरेल. हे मनुष्याचे कर्तव्य ठरते. मनुष्याचे जीवन यज्ञमय झाले पाहिजे.

**यज्ञाचे वैशिष्ट्य–गुप्तदान**

यज्ञात दग्ध झालेली घृतादि द्रव्ये व समिधा यांचा सुगंध चोहीकडे पसरतो. हा सुगंध कोण देत आहे हे कोणालाच कळत नाही, किती लोकांना दिला हे ही कळत नाही. दात्याला दान घेणाऱ्याची माहिती नाही, दान घेणाऱ्याला दात्याचा परिचय नाही. असा हा उच्च दानविधि यज्ञाने साध्य होतो. दान गुप्तच असावे हे यज्ञदानाचे वैशिष्ट्य आहे.

**यज्ञात परमात्मा**

तस्मात् सर्व गतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम्।

सर्व व्यापक परमात्मा यज्ञात नित्य उपस्थित असतो. आपणाजवळ नित्य परमेश्वराने असावे अशी ज्याची इच्छा असेल त्यानी प्रशस्यतम कर्मे करावीत. जोवर शुभ कर्मे त्यांच्याकडून होत राहतील तोवर परमेश्वर त्याच्या सन्निध राहील. स्व कर्मणा तं अभ्यर्च सिद्धिं विन्दति मानवः। गीता १६/४६

स्वतःला कधी करंटेपणाचा दोष देता नये.

त्याची पूजा आपल्या कर्माच्याद्वारे करणारा मनुष्य अंतिम सिद्धि प्राप्त करुन घेऊ शकतो.

गीता अध्याय ३ श्लोक १० ते १५ या सहा श्लोकात विश्वव्यापी यज्ञ चक्राचे वर्णन आहे. हे यज्ञ चक्र परमात्मा चालवितो. (एवं प्रवर्तितं चक्रं) सारी मनुष्येतर सृष्टी या यज्ञचक्राच्या नियमानुसार वागते. परंतु मनुष्यात विविध बुद्धी, स्वतंत्र इच्छा शक्ती असल्याने तो या यज्ञ चक्राप्रमाणे आपला व्यवहार करीलच असे नाही. तो यज्ञचक्राप्रमाणे व्यवहार करील तर सुखी होईल, यज्ञ चक्राविरुद्ध व्यवहार करील तर त्याला सुख प्राप्त होणार नाही व उत्तम गतीही प्राप्त होणार नाही. मनुष्य व इतर सृष्टीत हा फरक आहे. स्वयं प्रेरणेने केलेल्या यज्ञानेच मुक्ति मिळते यास्तव मनुष्येतर सृष्टी यज्ञचक्रानुरुप वागत असताना त्याना मुक्ति नाही.

गीता अध्याय ४ श्लोक २५ ते ३० या सहा श्लोकात कित्येक प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत. ते सर्व बलवान मनुष्यालाच करता येतील. बलहीन मनुष्य अथवा दुर्बल राष्ट्र यांची लूटच व्हावयाची कारण ते आत्मयज्ञ करु शकत नाहीत. उत्कर्षाची इच्छा असणाऱ्याने कोणत्याना कोणत्या प्रकारचे बल संगृहित करून ते वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे मगच त्या बलाचा त्याने परोपकारार्थ यज्ञ करावा.

मनुष्येतर जगात परमात्म्याच्याद्वारे यज्ञ होत आहे. त्यात परमात्म्याचे नियम काम करीत आहेत. मनुष्येतर सृष्टी परवशतेमुळे त्या यज्ञ चक्रात फिरत आहेत त्यामुळे ते मुक्त होत नाहीत. जीवांची क्रमाने उन्नति झाल्याने मानव योनी प्राप्त होते. या योनीत आपल्या प्रयत्नाने तो जीव आपली उन्नति करुन घेण्यास समर्थ होतो. मनुष्य स्वतंत्र आहे यत्न करील तर उन्नति निश्चित होईल. युद्धासाठी उभा राहिल्यास स्वतः परमात्मा सारथी होऊन त्याला साहाय करील. म्हणून मानवाने विश्वव्यापी यज्ञ आपल्या आचरणात आणावे. स्वतःचे वर्तन यज्ञरुप बनवून परम उन्नति प्राप्त करुन घ्यावी.

या ठिकाणी परमात्मा आत्मयज्ञाचा आदर्श मनुष्याच्या समोर उभा करतो. या सृष्टीची रचना परमात्म्याच्या आत्म यज्ञामुळेच झाली आहे. आपल्या सामर्थ्याचा अधिकाधिक यज्ञ परमात्म्याने केला म्हणून तो परम उच्च स्थानी विराजमान झाला.

शतपथ ब्राह्मणात असे म्हटले आहे. ब्रह्म वै स्वयंभु तपो अतप्यत्। तत् ऐक्षत न वै तपस्य आनंन्तं अस्ति। हन्त अहं भूतेषु आत्मानं जुहुवामि भूतानि च आत्मनि इति। सत् सर्वेषु भूतेषु आत्मानं आत्मानं हुत्वा भूतानि च आत्मनि सर्वेषां भूतानां श्रेष्ठ्यं, स्वाराज्यं आधिपत्यं पर्मैत्। तथैव एतत् यजमानः सर्व मेधे सर्वान् मेधान् हुत्वा सर्वाणि भूतानि श्रेष्ठ्यं स्वाराज्यं आधिपत्यं पर्येति।(१३/७०) स्वयंभू ब्रह्माने तप केले त्यामध्ये अनंतत्व नाही हे त्याला उमजले तेव्हा त्याने विचार केला की आपण भूतामध्ये आपला स्वतःचा व सर्व भूतांचा आपल्या आत्म्यात यज्ञ करावा. त्याने स्वतःचा सर्व भूतामध्ये यज्ञ केला आणि आत्म्यामध्ये सर्व भूतांचा यज्ञ केला. या आत्म समर्पणरुप यज्ञाने त्याने श्रेष्ठता स्वाराज्य आणि प्रभुत्व मिळविले. अशाप्रकारे जो आत्म सर्वस्वाचा यज्ञ करील त्याला श्रेष्ठता स्वाराज्य आणि अधिपत्य निःसंशय प्राप्त होईल.

**आत्मयज्ञ**

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन।
नानवाप्तं अवाप्तव्यं वर्ण एव च कर्मणि। (अताप्तव्यं)

या त्रिभुवनात मला काही करावयाचे राहिलेले नाही. अप्राप्त अशी कोणतीच वस्तु मला प्राप्त करुन घ्यावयाची नाही. तथापि मी यज्ञ कर्म करीतच आहे. पूर्ण आप्तकाम होऊनही लोक संग्रहासाठी करावयाच्या कार्याकरता आत्मसमर्पण करणे याचेच नांव आत्मयज्ञ. हा यज्ञ स्वयंभू ब्रह्माने केला.

---

आकांक्षा नसली की कामना नाही.

त्या परमात्म्याच्या यज्ञाबरोबर आपले जीवनही तसेच यज्ञमय करील तो पुरुष त्याच्याप्रमाणे श्रेष्ठ होईल. तो नराचा नारायण होईल. पुरुषाचा पुरुषोत्तम होईल. जो पुरुष आपले जीवन यज्ञमय बनवतो, इंद्रिय संयम करतो, परमेश्वरीय महायज्ञात आत्मार्पण करतो. तोच आपले जीवन सफल करु शकतो. या विरुद्ध ज्याचे जीवन स्वार्थी आहे त्याचे अवघे जीवन संपन्न व सुखपूर्ण असले तरी पापी जीवनाचा भयानक दुष्परिणाम त्याला भोगावा लागतो. सर्व भूतांच्या हितासाठी आपली आहुति देतो तो पुण्यात्मा आणि जो आपल्या हितासाठी सर्व भूतांची आहुति घेतो तो पापात्मा. पापात्म्याची सुरुवातीला चलती आढळते. थोडा काळ लोटल्यानंतर त्याची दुर्गती होते. यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते। ४/२३

यज्ञासाठी कर्म करण्याने कर्म संपूर्णपणे नष्ट होते. मनुष्य शुद्ध होतो. हे कर्म नष्ट होण्याचे तात्पर्य होय. सज्जनांचा यथायोग्य सत्कार करणे, संघटनेच्याद्वारे जनतेत बळाची वृद्धीकरणे आणि दीनाना सहाय करणे या विविध कर्माचे नांव यज्ञ.

**ब्रह्मयज्ञ**

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविः ब्रह्मग्नौ ब्रह्मणाहुतम् ।

ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्म कर्म समाधिना। ४.२४

गीता अध्याय ४ श्लोक २४ ते ३३ या दहा श्लोकात अनेक प्रकारच्या यज्ञाचे वर्णन आहे. यावरुन यज्ञाची व्यापक कल्पना ध्यानात येईल. ब्रह्म यज्ञ, द्रव्यमय यज्ञ, शरीर यज्ञ, वाग् यज्ञ, प्राण यज्ञ, बुद्धि यज्ञ, कर्म यज्ञ व ज्ञान यज्ञ.

ब्रह्म यज्ञ हा सर्वात पहिला यज्ञ. याचे तीन अर्थ संभवतात. परमात्म यज्ञ, जीवात्म यज्ञ, ज्ञान यज्ञ. ज्ञान यज्ञाचे दोन प्रकार : भौतिक ज्ञान, मोक्ष ज्ञान. भौतिक ज्ञान यज्ञात प्रापंचिक सुखाची वृद्धि होते. सृष्ट पदार्थाची विद्या भौतिक ज्ञान यज्ञात शिष्याला दिली जाते. मोक्ष ज्ञान यज्ञाने शांति अथवा ब्रह्म स्थिती प्राप्त होते.

अन्यं तमः प्रविशन्ति ये अविद्यां उपासते। ततो भूय इव ते तमो य उ विद्यायां रताः। अन्यत् एव आहुः विद्याया अन्यत् आहुः अविद्यायाः। इति शुश्रुम धीराणां येनः तत् विचचक्षिरे। विद्यां च अविद्यां च यःतत् वेद उभयं सह। अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्यया अमृतं अश्नुते। ईश-९-११ या ब्रह्म यज्ञात सृष्टि विद्या आणि ब्रह्म विद्या या दोन्ही विद्या प्राप्त करण्याचा उपदेश केला आहे. हा ज्ञान यज्ञ आहे. हे ज्ञान गुरु आपल्या शिष्याच्या अंतःकरणात हवन करतो. या ब्रह्म यज्ञात गुरु यजमान आहे. शिष्याचे अंतःकरण अग्नि आहे. त्यात या ज्ञानरुपी हवीच्या आहुती घातल्या जातात.

ब्रह्म यज्ञाचा दुसरा अर्थ परमात्म यज्ञ. शतपथ ब्राह्मणात याचा उल्लेख आहे. तो या लेखात अन्यत्र उल्लिखित केला आहे. त्यावरुन ब्रह्म यज्ञ हाच आत्मयज्ञ म्हणजेच आत्मसमर्पण.

जो मनुष्य अधःपतित लोकांच्या उद्धारासाठी आत्म समर्पण करील त्याचे महत्व अधिक वाढेल. परमात्म्याच्या आत्मयज्ञाचे स्वरुप हे असे आहे. आत्मयज्ञ करणारा विश्व विजयी होतो. विश्वजित विश्वभृत् विश्वकर्मा। अथर्व ४/११/५ जो विश्वाच्या सुखासाठी कर्म करतो, विश्वाचे भरणपोषण करण्यासाठी प्रयत्न करतो तो विश्व विजयी होतो.

**मनुष्याचा आत्मयज्ञ**

मनुष्याच्या उन्नतीचे हेच एक मात्र साधन आहे. मनुष्याने आपल्या अधिकाराची घमेंड न बाळगता कनिष्ठ मनुष्याकडे जावे. त्यांची परिस्थिती पहावी, त्यांची सुधारणा करण्याचा यत्न करावा आणि त्यांची सेवा केल्याने आपली इति कर्तव्यता होईल असा विश्वास मनात बाळगावा. हेच तत्व परमात्मयज्ञ अथवा ब्रह्मयज्ञ यात आहे. सर्व भूत हिते

रताः। या गीतेच्या संकल्पनेत तेच आहे. अध्यापनं ब्रह्म यज्ञः। मनु ३.७०

ब्रह्माचे ब्रह्मात हवन हे वर्णन यज्ञाचा यज्ञ द्वारा यज्ञेन यज्ञं अयजन्त। या प्रमाणे आहे. अथ खलु ऋतुमयः अयं पुरुषः। यथा ऋतुः अस्मिन् लोके पुरुषःभवति। छा.३/१४/१. मनुष्य यज्ञमय आहे. जसा यज्ञ करतो तसा तो होतो. कारण उन्नति करण्याचे साधन एकच तो म्हणजे यज्ञ. त्याखेरीज उन्नतीचा दुसरा मार्ग नाही. आत्मार्पणाचे यज्ञ म्हणजे परमात्म्यात अर्पण झाले पाहिजे म्हणजे मी अर्पण करतो हा अहंकारही नाहीसा होतो.

**संयमाग्नित हवन**

इंद्रियांना स्वैर न सोडता आत्मसंयमन करुन इंद्रियांची आणि प्राणांची होतील तितकी कर्मे करावी. संयमाने भोगेच्छा आणि भोग प्रवृत्ति मर्यादित राहून मनुष्याची उन्नति होईल.

**द्रव्य यज्ञ**

द्रव्याचा यज्ञ करणारे (द्रव्य-धन दौलत) आपल्या जवळचे धन लोक कल्याणा करता खर्च करणारे विहिरी, तलाव, घाट, मंदिरे, धर्मशाळा, पाठशाळा, गुरुकुले, अनाथालये इत्यादि संस्था व लोकोपयोगी कार्ये ही द्रव्य यज्ञाची उदाहरणे आहेत. राष्ट्रातील धनवान जितका अधिकाधिक द्रव्य यज्ञ करतील तितक्या या संस्था कार्यरत होतील. त्या प्रमाणात जनता जनार्दनाची सेवा घडेल.

**तपो यज्ञ**

खस्ता खाऊन धर्म कार्य करणे. यम, नियम, व्रत, उपवास इत्यादिद्वारे आपले पावित्र्य संपादणे. हा तपाचा अर्थ आहे. आत्मशुद्धीसाठी तप मोठे साधन आहे. विविध प्रकारचे तप ऋतं तपः सत्यंतपः, शान्तं तपः। दमस्तपः, शमस्तपः, दानं तपः, यज्ञं तपः भूः भुवः स्वः ब्रह्म एतत् उपास्यै तत् तपः (महा नारायणीय् उपः १/१०) सरलता, सत्य, विद्याध्ययन, शांति, इंद्रिय दमन, मनः संयम, दान, यज्ञ, आपले भू-अस्तित्व, भुवः ज्ञान आणि स्वः आनंद यासाठी प्रयत्न करणे ब्रह्म प्राप्तीचे अनुष्ठान करणे याचे नांव तप यज्ञ होय. तप हे सर्वत्र लाभदायक, तपाचा अभाव जीवनाला हानीकारक.

मनुष्यात दान वृत्ती, त्याग वृत्ती, तपोवृत्ती म्हणजेच यज्ञवृत्ती लुप्त होईल तर मनुष्यच राहाणार नाही. पशूपेक्षाही अवनत होईल. यज्ञ करण्यानेच मनुष्याचे मनुष्यपण टिकते. यज्ञाची प्रवृत्ती मनुष्याबरोबरच उत्पन्न झालेली आहे.

**श्री. शं. बा. मठ**

६, कुमार आशिष,
राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३२०३०

●●●

**दिशासाठी**

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**


# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*श्री. यशवंत साने यांच्या लेख मालेतील पुढील लेख.*

**प्रास्ताविक**

दिशाच्या ऑक्टोबर २०१२ च्या अंकात आपण 'अध्यात्मशास्त्र ह्यातील अत्यंत महत्त्वाच्या अशा 'अनुभूतीवाद' व 'अनुभूतीशास्त्र' ह्यांच्या संकल्पनांचा उल्लेख केला.

महामहोपाध्याय बाळशास्त्री हरदास यांनी त्यांच्या **''वैदिक राष्ट्रदर्शन''** (खंड ३ रा). ह्या पुस्तकात, ह्या संकल्पनेचा जोरदार उल्लेख केला व आग्रहाने प्रतिपादिले की भारतात 'Philosophy' म्हणजे तत्त्वज्ञान याला फार उच्च स्थान दिले जात नाही, तर 'अनुभूतीवाद' व 'अनुभूतीशास्त्र' ह्यावर आधारलेले 'ज्ञान' हेच अध्यात्मवादाच्या उद्दिष्टासाठी व प्राप्तीसाठी सर्वात महत्त्वाचे प्रमाण व साधन मानले जाते.




मी या विचारांचा मागोवा घेण्याचा खूप प्रयत्न केला, पण ह्या 'अनुभूतीशास्त्राचा' सरळ व सोपा पत्ता मला एकत्रितपणे कुठेही सापडला नाही.

**Integral Sociology**

हीच अवस्था महायोगी अरविंद घोष यांच्या "Integral Sociology" ह्या विषयाबद्दल माझी झाली होती. सुदैवाने माझे परम मित्र श्री. नरेंद्र नाडकर्णी, जेव्हां पाँडिचरीला गेले होते, तेव्हां त्यांनी माझ्यासाठी किशोर गांधी यांचे ह्या विषयावरचे पुस्तक आणले. किशोर गांधी यांना अरविंदांचे ह्या विषयावरचे विचार एकत्र करून त्यावर निवेदन व भाष्य करून जे काही उद्योग करावे लागले, तसाच प्रसंग जवळ जवळ माझ्यावर ओढवलेला आहे.

हे मी अशासाठी सांगतो आहे कीं या प्रयत्नांकडे तितक्या सहानुभूतीने व त्याहीपेक्षा त्यातील 'अध्यात्मशास्त्राच्या' गहन व गूढ ज्ञान व साधनेसाठी उपयुक्त ठरेल अशा विचारांच्या व ज्ञानाच्या संकल्पनेचा पाठपुरावा करणे किती अगत्याचे आहे, हे वाचकांच्या व साधकांच्या व विद्वानांच्या मनावर बिंबवले जावे!!

भारतीय संस्कृतीतील हा ठेवा मानवजातीसाठी अनमोल आहे. त्याचा शोध, पुनरुज्जीवन करणे आपले कर्तव्य आहे!


ह्या प्रयत्नांच्या उत्साहाला प्रभावी मदत व्हावी.

## जीवात्मा माणसाची तीन शरीरे

असे 'एक **कल्पनाचित्र**' इथे छापले आहे. ते अगोदरही दिशाच्या इतर अंकात वापरले आहे. पण आज ह्या अंकात त्या चित्राचे पुनर्मुद्रण अशासाठी की ते आपल्या 'अनुभूतीशास्त्राच्या' विवेचनाला जबरदस्त सुयोग्य आधार पुरणारे ठरेल, असा माझा विश्वास आहे!

ईशोपनिषद् : 59

बन्धन छूट सकता है। मृत्यु का बन्धन किस प्रकार छूट सकता है यही अन्तिम प्रश्न है, जो इन मन्त्रों के सम्बन्ध में उत्पन्न होता है। इस प्रश्न का उत्तर सुगमता से समझ में आ जावे इसलिए हम इन शरीरों का एक कल्पित चित्र नीचे देते हैं–




इन्हीं तीनों शरीरों का विभाग एक और प्रकार से किया गया है जिसे कोष कहते हैं उसका विवरण इस प्रकार है–

(१) स्थूल शरीर–अन्नमय कोश

(२) सूक्ष्म शरीर–१. प्राणमय, २. मनोमय, ३. विज्ञानमय कोश।

(३) कारण शरीर–आनन्दमय कोश

योग–३ शरीर–५ कोश

इन तीनों शरीरों के दो सम्बन्ध हैं–

(१) अवस्थाओं के द्वारा सम्बन्ध।

(२) प्राण के द्वारा सम्बन्ध।

हे चित्र 'उपनिषद रहस्य' या महात्मा नारायण स्वामी यांच्या 'ईशोपनिषद' या अध्यायात पान ५९ वर छापले आहे.

ह्या चित्रांत 'मानवी शरीर' हे प्रत्यक्षात विश्वरचनेच्या रचनेतील 'तीन शरीरांच्या' संयोगाचे अस्तित्व म्हणून 'जाणले' गेले आहे. मी 'जाणले' गेले आहे असे कां म्हणतो आहे?

कारण, ही तीन शरीरे खालीलप्रमाणे आहेत.

58 : उपनिषद् रहस्य

व्यापक कारण रूप प्रकृति का जो अंश हमारे अन्दर है उसी का कल्पित नाम कारण शरीर है। कार्य शरीर दो हैं–सूक्ष्म और स्थूल। इन तीनों के काम पृथक्-पृथक् हैं–

(१) स्थूल शरीर–सूक्ष्म शरीर का साधन है। उसी के द्वारा विषयमय जगत् से सूक्ष्म शरीर का सम्बन्ध होता है, स्थूल शरीर के विकसित और पुष्ट होने से शारीरिकोन्नति होती है। राममूर्ति और सैण्डो आदि इसके उदाहरण हैं।

(२) सूक्ष्म शरीर–१७ वस्तुओं के समुदाय का नाम है–

५ ज्ञानेन्द्रिय

५ सूक्ष्म विषय–तन्मात्रा (शब्द, स्पर्श, रूप, रस, गन्ध)

५ प्राण (प्राण, अपान, व्यान, समान, उदान)

१ मन

१ बुद्धि

योग १७

सूक्ष्म शरीर के विकसित और पुष्ट होने से मानसिकोन्नति होती है। मानसिकोन्नति किये हुए पुरुष जाति के नेता, राजा और उच्च राज्य कर्मचारी हुआ करते हैं और कारण-शरीर के विकसित और पुष्ट होने से मनुष्य में ईश-प्रेम आता है और वह भक्त और योगी बना करता है। आशय यह है कि तीनों प्रकार के शरीर उन्नत होने चाहिए। शरीरों का इतना विवरण जान लेने से इन मन्त्रों के अर्थ समझ लेने में सुगमता हो जाती है। मन्त्र कहता है कि यदि स्थूल और सूक्ष्म शरीरों की उपेक्षा करके केवल कारण शरीर की उन्नति चाहते हो तो अन्धकार में पड़ना पड़ेगा, क्योंकि बिना स्थूल और सूक्ष्म शरीरों के उन्नत हुए कारण शरीर को उन्नति प्राप्त नहीं हो सकती। और यदि कारण शरीर की उपेक्षा करके केवल कार्य शरीर स्थूल + सूक्ष्म शरीरों को उन्नत करना चाहते हो तो भी भविष्य अन्धकारमय होगा, क्योंकि इस से नास्तिकता उत्पन्न होगी। जैसे चार्वाक और यूरोप के प्रकृतिवादी नास्तिक विद्वान्। इसीलिए तीसरे मन्त्र में, सिद्धान्त और कर्त्तव्य रूप से, यह शिक्षा दी गई है कि दोनों प्रकार के शरीरों की उन्नति साथ-साथ होनी चाहिए, तभी मृत्यु का

१) स्थूल शरीर – दृश्य, जड

२) सूक्ष्म शरीर – अदृश्य

३) कारण शरीर – अव्यक्त 'पुरुष' या संकल्पनेत.

शिवाय यांतील 'टीप' महत्त्वाची आहे.

- स्वप्न अवस्थाद्वारे सूक्ष्म व –कारण शरीरांचा संबध जाणला जातो.
- सूक्ष्म व स्थूल शरीरांचा संबंध 'जागृत' अवस्थामध्ये जाणला जाऊ शकतो.
- 'प्रमाण' के द्वारा स्थूल व सूक्ष्म शरीराचा संबंध जाणला जाऊ शकतो.

शिवाय एक गोष्ट महत्त्वाची की

'कारण शरीर' ह्याचे वर्णन किंवा कल्पना ही की ते ''घटाकाश-मढाकाशवत्'' आहे.

इंग्रजीत त्याचे 'Space' असे वर्णन होऊ शकेल ('पुरुष' आकार ही Space व्यापतो)

महात्मा नारायणस्वामी सांगतात कीं, ''कारण रूप'' प्रकृति का जो अंश हमारे अंदर है, उसी का कल्पित नाम 'कारण शरीर' है। महत्त्वाचे हे की तोच 'आनंदमय कोष आहे.

### कार्यशरीर दो है – सूक्ष्म और स्थूल

यावरचे भाष्य मी मुद्दामच यात मुद्रित करत आहे. ते काळजीपूर्वक वावाचे. ह्याचे कारण हेच की जन्मा अगोदर, पृथ्वीवरच्या जीवनात व मृत्यूनंतरच्या वैश्विक प्रवासात **'जीवात्मा'** म्हणजे **''आपण खुद्द''** सूक्ष्म शरीराच्या स्वरूपात वावरतो हे स्पष्ट व्हावे.

ह्या संकल्पना खूप काळजीपूर्वक व अभ्यासपूर्वक जाणणे आवश्यक आहे. कारण, उघड आहे. जड जगांत आपण स्वतः व भौतिकवादी समाज हा आपले अस्तित्त्व केवळ 'स्थूल शरीर' म्हणून जाणतो व 'मेडिकल सायन्स', समाजशास्त्र व राज्यशास्त्र आपली Identity ही 'Pan Card', ' Passport', 'Ration Card' व आतां काँग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी, प्रेसिडेंट काँग्रेस पार्टी व मनमोहन सिंग, पंतप्रधान यांच्या सौजन्याने 'Fool Proof' अशा 'आधार कार्डानें' अचूक जाणणार आहोत.

तेव्हा कोणी, नवीन अर्भकाचा ह्या पृथ्वीवर जन्म झाला तर सरकारी अधिकारी त्याला त्याचा 'पुनर्जन्म' सिद्ध करण्यासाठी 'आधार कार्डाची' मागणी, ह्या 'भारतात' (India) करणार नाही कां? माझा रोख मानवी मर्त्य देहालाच 'Reality' सत्यता देणाऱ्या सगळ्या समाजावर आहे. हा स्थूल देह अन्नमय कोष होय.

पुन्हा आपण आपल्या मूळ विषयाकडे वळू या. जीवात्मा व त्याची तीन शरीरे हे जर आपले वैश्विक'सत्य अस्तित्व' असेल व आहेच, तर भारतीय संस्कृतीत आत्मदर्शन हीच खरी आत्मानुभूती आहे.

### अनुभूतीची सामान्य व्याख्या

मग 'अनुभूतीं'ची सर्वसामान्य व्याख्या काय आहे? "Disctionary Meaning" संस्कृत-इंग्लिश डिक्शनरीचे विद्वान कर्ते श्री. वामन शिवराम आपटे, ह्यांच्या 'डिक्शनरी' 15 February 1890 मध्ये 'अनुभूती' पुढे q.u. quod vide, whichsee म्हणजे अनुभव अशी टीप आहे. अनुभव ह्याचा एक अर्थ "Direct perception or Cognition, knowledge derived from personal observation or experiment, the impression on the mind not derived from memory, one of the kinds of knowledge. नंतर नैयेसिक्यांच्या प्रत्यक्ष अनुमान, उपमान व शब्द ह्या Four sources of knowledge; the vedantins and mimasaks (वेदान्ती व मीमांसक) ह्यांच्या, अर्थापत्ती, अनुपलाब्धि त्या संकल्पना सांगतात.

### आधार तत्त्वज्ञानाचा का अनुभूतीचा?

मी ह्या प्रांतात आतांतरी तात्काळ शिरुं इच्छित नाही कारण, 'पातंजल योग शास्त्राचा आधार आपण हेतू पुरस्सर घेत आहोत. 'Textual Explanation' किंवा 'संकल्पना', त्याचा आधार घेताना आपण पुन्हा शब्दार्थ व जड बुद्धीप्रश्वाण प्रमाणांच्या जंजालसम जाळ्यांत अडकून जाऊं व नंतर बोध होणे कठीण आहे!!

### योग मार्गे अर्थप्राप्ति बोध व अनुभूती

ह्या अर्थप्राप्तीच्या कोड्याचा उलगडा एका निराळ्या पद्धतीने होणे आवश्यक आहे, असे मला निश्चयात्मकपणे वाटते. 'आत्मा हा 'स्वयंप्रकाशी व 'स्वसंवेद्य' व 'अशाब्द' आहे. तेव्हां त्याला त्याच्याखेरीज कोण पहाणार? (अशाब्द – मधूर रसाचा स्वाद घेणारा

राहत्या जागेविषयी महत्त्व नसावे.

त्याची अनुभूती दूसऱ्याला कशी देणार?) ह्या कोड्याचे उत्तर 'पातंजल योग शास्त्रात काय दिले आहे?

**''सत्व पुरुष थोर त्यन्तासङ्कीर्णयो: प्रत्ययाविजेषो भोग: परार्थत्वात्स्वार्थ संयमात्पुरुषज्ञानम् ।।३५।। विभूतिपाद**

सूत्रार्थ :-

**अत्यंत भिन्न स्वरुपवाले बुद्धि और पुरुष का अभिन्न रुप से ज्ञान होना – एक रुप से प्रतीति होना भोग है,**

**वह भोग बुद्धि के परार्थ – पुरुष के प्रयोजन की सिद्धि के लिए अभिव्यक्त होता है।**

**भोग बुद्धि से भिन्न स्वार्थ ज्ञान में संयम करने से पुरुष – जीवात्मा का ज्ञान होता है।**

### जीवात्म्याचा स्वत:चा अभ्यास


पुन्हा एकदा आपल्या अभ्यासाचा मार्ग अवलोकन करुं या.

१) प्रथम प्रयत्न म्हणजे आपण स्वत:ला जाणण्यासाठी आपण जीवात्मा आहोत व आपल्याला स्वत:च्या 'स्थूल शरीराच्या – मर्त्य अवस्थेला निराळी अशी तीन शरीरांची जाणीव व्हावयाला हवी.

२) ह्या तीन शरीरांत सूक्ष्म शरीरात 'जीवात्मा' आहे व तो विश्वसंचार-पूर्व आयूष्यातील व भविष्यातीलही आहे. तो ह्या 'सूक्ष्मशरीराच्या भूमिकेतून' करणार आहे. तेव्हां त्याला हे जागृत अवस्थेतही 'जाणता' आले पाहिजे **म्हणजेच 'आत्मदर्शनाची' 'अनुभूती' मिळवली पाहिजे.**

### चित्त विज्ञान

ही 'अनुभूती' ज्ञान मिळवण्यासाठी 'चित्त विज्ञान' आवश्यक आहे. पण, मुख्य अडचण ही आहे की 'चित्त' हे सूक्ष्मशरीरात अंत:करण चतुष्टय म्हणजे 'चित्त, बुद्धि, मन व अहंकार' ह्यातील एक भाग आहे. ह्याकरिता गुरुकिल्ली पुढील योगसूक्तात आहे.



विभूतिपादः ५८७

व्यासभाष्य :—

यदिदमस्मिन्ब्रह्मपुरे दहरं पुण्डरीकं वेश्म तत्र विज्ञानं तस्मिन्संयमाच्चित्तसंवित्॥

(यत् इदम्) जो यह (अस्मिन्) इस (ब्रह्मपुरे) ब्रह्मपुर = हृदय में (दहरम्) अल्प = सूक्ष्म (पुण्डरीकम्) कमल के आकार वाला (वेश्म) स्थान है, (तत्र) वहाँ (विज्ञानम्) सम्यक् एवं विविध ज्ञान के साधन, चित्त का निवास है। (तस्मिन्) उस हृदय में (संयमात्) संयम करने से (चित्तसंवित्) चित्त का ज्ञान होता है॥

भोजवृत्तिः—

हृदयं शरीरस्य प्रदेशविशेषः, तस्मिन्नधोमुखस्वल्पपुण्डरीकाभ्यन्तरेऽन्तःकरणसत्त्वस्य स्थानं, तत्र कृतसंयमस्य स्वपरचित्तज्ञानमुत्पद्यते, स्वचित्तगताः सर्वा वासनाः, परचित्तगतांश्च रागादीन् जानातीत्यर्थः॥

(हृदयम्) हृदय (शरीरस्य) शरीर का (प्रदेशविशेषः) विशेष स्थान है। (तस्मिन्) उस हृदय अर्थात् (अधोमुखस्वल्पपुण्डरीकाभ्यन्तरे) नीचे मुख किए सूक्ष्म कमलाकार के अन्दर (अन्तःकरणसत्त्वस्य) सत्त्वगुण प्रधान अन्तःकरण (चित्त का (स्थानम्) स्थान है। (तत्र) उस हृदय में (कृतसंयमस्य) संयम करने वाले योगी को (स्व-परचित्तज्ञानम्) अपने और दूसरों के चित्त का ज्ञान (उत्पद्यते) उत्पन्न होता है। (स्वचित्तगताः) अपने चित्त में स्थित (सर्वाः) सभी (वासनाः) वासनाओं (च) और (परचित्तगतान्) दूसरे के चित्त में विद्यमान (रागादीन्) राग आदि को (जानाति) जानता है (इति अर्थः) यह अर्थ है॥

-: वैदिक योगमीमांसा :-

इस सूत्र में महर्षि पतञ्जलि ने हृदय में संयम का फल कहा है। योगी द्वारा हृदय में संयम करने से हृदयस्थ चित्त का ज्ञान होता है। महर्षि व्यास कहते हैं — ब्रह्मपुरे दहरं पुण्डरीकं वेश्म तत्र विज्ञानम् — यह वाक्य छान्दोग्योपनिषद् ८.१.१ से साम्य रखता है, जोकि इस प्रकार है —

अथ यदिदमस्मिन् ब्रह्मपुरे दहरं पुण्डरीकं वेश्म दहरोऽस्मिन्नन्तराकाशस्तस्मिन् यदन्तस्तदन्वेष्टव्यं तद्वाव विजिज्ञासितव्यमिति॥ इसका अर्थ करते हुए महर्षि दयानन्द लिखते हैं —

कण्ठ के नीचे, दोनों स्तनों के बीच में और उदर के ऊपर जो हृदय देश है, जिसको ब्रह्मपुर अर्थात् परमेश्वर का नगर कहते हैं, उसके बीच जो गर्त है, उसमें कमल के आकार वेश्म अर्थात् अवकाशरूप एक स्थान है और उसके बीच में जो सर्वशक्तिमान् परमात्मा बाहर और भीतर एक रस होकर भर रहा है, वह आनन्दस्वरूप परमेश्वर उसी प्रकाशित स्थान के बीच में खोज करने से मिल जाता है। दूसरा उसके मिलने का कोई उत्तम स्थान वा मार्ग नहीं है। (ऋ० भू० उपासनाविषय)

इस ब्रह्मपुर अर्थात् हृदय में जो गर्त है, उसमें कमलाकार वेश अर्थात् अवकाशरूप स्थान है, उस स्थान में, महर्षि व्यास, विज्ञान को भी कहते हैं। विज्ञान का तात्पर्य यहाँ सम्यक् ज्ञान और विविधज्ञान का साधन चित्त[1]

१. चित्तं विज्ञानम्। (यजु० २०.६)
— चित्तम् सम्यग्ज्ञानं विविधज्ञानं वा। (महर्षि दयानन्द सरस्वती)
— चित्तम् = विज्ञानसाधिकामन्तःकरणवृत्तिम्॥ (यजु० ३४.२ पर महर्षि दयानन्द सरस्वती)

### हृदये चित्तसंवित ।।३४।।

ह्याचा थोडक्यात अर्थ हा कीं योगी साधकाला 'हदयस्थानावर संयम्' केल्याने हृदयांतच सामावलेल्या 'चित्ताचे' ज्ञान-विज्ञान होते. विज्ञानाचा अर्थ सम्यकज्ञान आणि विविध ज्ञान हे या चित्ताच्याद्वारे होणार आणि चित्त हे जीवात्माच्या सूक्ष्म शरीराचे एक अंग आहे.

### योग साधना संयमाची

यापुढील साधना आहे चित्तावर 'संयम' करण्याची संयम म्हणजे चित्त ह्या विषयावर आकलन करुन योग म्हणजे ध्यान, धारणा, समाधि ह्या प्रवाहाची एकचित्त 'निरंतर साधना', ही केल्यावर 'असंप्रज्ञात समाधि'द्वारे हे अंतिम आत्मदर्शन वा 'आत्मसाक्षात्कार' होऊ शकते. पण, मग नक्की कोणता हा 'साक्षात्कारं'? तर हा साक्षात्कार म्हणजे ही ''परमोच्च 'अनुभूती' आता आपण ह्या


'अनुभूतीं या योगिक साधनेची 'पराकाष्ठेची उपयुक्तता' जाणली असे समजू या.

**अनुभूतीशास्त्राचे सोपे सोपान**

ह्या 'अनुभूती' घेण्याच्या तंत्राची माहिती थोड्या साध्या सोप्या उदाहरणांनी जाणून घ्यावयाचा प्रयत्न करु या. सर्वसाधारण साधक हा आपल्या चर्मचक्षू आणि इतर ज्ञानेंद्रियाच्या मार्फत शरीराबाहेरील वस्तूंचे दर्शन घेऊ शकतो व त्या वस्तूंचे 'भौतिक स्वरुप व अस्तित्व ह्यांचा 'अनुभव' येतो. पण, आपण ज्या आध्यात्मिक साधनेचा विचार करतो आहे त्या वस्तू सूक्ष्म व अंतरंगात जाणण्याच्या योग्यतेच्या आहेत.

**प्रतिक, प्रतिमा अवलंबन**

तेव्हां हा साधक सुरुवातीला 'प्रतीकांचा' अवलंब करतो शास्त्राकार प्रतिक कशाला म्हणतात?:-




''आंतर आणि बाह्य जगतातील ज्या साऱ्या विशेष शक्तिशाली वस्तू मानवाच्या मनांत स्वभावतः आंतरिक भाव जागृत करून त्याला जगत कारणाचा शोध व साक्षात्कार करुन घेण्याकडे उद्युक्त करतात त्यांनाच 'प्रतिक' म्हणतात आणि धातू, दगड किंवा माती इत्यादी कुठल्याही वस्तूने घडवलेल्या एखाद्या कृत्रिम मूर्तीच्या ठिकाणी जगत्कारणाच्या सृष्टिस्थिती आदी गुणसमूहाचा आरोप करुन वा त्याचा आवेश कल्पून तिच्या माध्यमातून पूजा घ्यानादिकांच्या योगे जगत्कारणाच्या साक्षात स्वरूपाची उपलब्धी करुन घेण्यासाठी जो प्रयत्न केला जातो त्यालाच 'प्रतिमापूजा' म्हणतात.

'अब्रह्माणि ब्रह्मदृष्ट्यानुसंधानम्' म्हणजे, सीमित स्वभाव असल्याकारणाने जी पूर्ण ब्रह्म नाही अशा एखाद्या वस्तुला वा व्यक्तीला ब्रह्म मानून तिच्या योगे पूर्णकामाच्या स्वरुपाची 'अनुभूती' प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करणे याचेच नांव प्रतीक व प्रतिमापूजा'. ह्या प्रयत्नांना 'देश कालद्वारा सीमित' अशा सगुण भावाची साधना म्हणता येईल, पण 'त्या वस्तूची निर्गुण भावाची प्रतीती होण्यासाठी समाधीच्या योगे उच्च भूमिकावर आरुढ होऊन त्या 'शक्तिचा' 'निर्गूण' साक्षात्कार होणे आवश्यक असते.

**मन व अनुभूती**

'अनुभूती' ह्या शब्दाने जाणली जाणारी मनाची अवस्था सर्वसाधारण माणसाला विनाप्रयत्न अशा शरीरयंत्रणे मार्फत होत असते. पण, त्याचा उपयोग काही सूक्ष्म व अंतर्गत 'विषयांशी' होत असताना ज्या क्रिया घडतात त्याची जाणीव व संवय ही लक्ष देऊन हुकमी पद्धतीने करण्याची क्षमता मनाला व्हावी लागते. त्यांतील प्राथमिक तयारी हठयोगातील 'बहित्राटक' ह्या साधनेने सुरु होऊ शकते. त्यांच्यातील 'ज्योति त्राटक' हे उत्तम करुन त्यांत ज्योतीतील 'अग्नि, प्रकाश, रुप व चैतन्य ह्यांची एकत्रित उपलब्धी 'निरांजन ज्योती'मध्ये होऊ

शकते. त्यातही तूपाची वात ज्योत व तेलाची वात ज्योत ह्यातील सूक्ष्म फरक ही जाणण्याची प्रक्रिया होऊ शकते व तिचाही अभ्यास करावा.

**सूक्ष्म अर्थ व जाणीवा**

ह्याचाच सूक्ष्म अर्थ हा की ज्योत ही जरी जड व दृश्य असलेली वस्तू असली तरी त्यांतील सूक्ष्म जाणीवा रूप, तेज, चैतन्य, उष्णता व जमण्यास सात्विकता वगैरे चीजा ह्या मात्र मन, प्राण व बुद्धी ह्या अंतःकरणातील यंत्रणेमार्फत जाणल्या जातात, हे आपण विचार केल्यावर लक्षात येते. वरवर ह्या साध्या दिसणाऱ्या गोष्टी असल्या तरीही आपल्या मनाला ह्या चींजा ज्या विशिष्ट जाणीवा कशा व कां होतात ह्याचे ज्ञान नसते व व्यवहारात त्याची विशेष दखल व अभ्यास करावा अशी गरज सामान्यपणे पडत नाही. पण, एखाद्या कलाकाराला, मानसशास्त्रज्ञाला, कवीमनाला ह्या चीजा काही विशिष्ट 'अनुभूती' देऊन जातात व त्यातील सूक्ष्म भेद व तीव्रता व गुणप्रकृती यांचे जास्त सखोल ज्ञान, अनुभूती व आनंद प्राप्त होतो. मनाच्या निरनिराळ्या अवस्था देखील हेच मन आपल्यावर पडणाऱ्या ह्या चीजांच्या प्रतिबिंबा वरून जाणून घेऊ लागतो.

**न्यास**

ह्या पुढील टप्पा म्हणजे 'न्यास' ही साधनेतील आवश्यक गोष्ट. सध्याच झालेल्या 'दुर्गा' पूजेतील 'जवार्नमंत्राचा' विचार करु या. 'कुंजिका स्तोत्रातील' ऐं, ऱ्हीं, क्लीं चामुण्डा ऐं, विच्चे हा 'करन्यास' घ्या. 'ऐं' या उच्चाराचा विशिष्ट पातळीवरील ध्वनीचा उच्चार केल्यावर व हाताच्या पंज्यातील अंगठ्यावर एकाग्र मन करुन आपल्या इच्छाशक्तीच्या प्रभावाने 'ऐं अंगुष्ठाम्यां नमः' म्हणताना मन व प्राण अंगठ्यावर एकाग्र चित्ताने खंड न पडता काही काळ हा ध्वनी स्पंदनाचा मारा केल्यावर अंगठ्याच्या अग्रावर स्पंदने होऊ लागल्याचा प्रत्यय येणे सहज शक्य होईल. पण हे श्रद्धेने, एकाग्रतेने, मन विचलित न करता व 'निरंतर' (खंड नाही व सतत व रोज) केल्यावर, ह्या ध्वनी स्पंदांचा व अंगठ्याचा संबंध प्रस्थापित होईल. हे जेव्हां अभ्यासाने रोज व आपल्या इच्छेनुसार होऊ लागले तेव्हा आपल्याला 'न्यास क्रिया' येऊ लागली असे म्हणता येईल.




येथे हा जो प्रयोग झाला तो 'मनाच्या' 'अनुभूती' घेण्याच्या क्षमतेचाच प्रयत्न आहे. ह्या क्रियेचे प्राविण्य प्राप्त करण्यासाठी रोज साधना आवश्यक आहे व त्यांत खंड पडता कामा नये.

या पुढचा प्रवास मग सोपा झाला. कारण, मनाच्या प्राणशक्तिचा व चित्ताचा परिचय तुमच्या मनाला विशिष्ट भेद व सूक्ष्म जाणीवेमार्फत झाला. हे तुमच्या मनाचेच 'शिक्षण' होय.

**अनुभूती क्रियेची यंत्रणा**

ह्या शिक्षणाची वर्गवारी करावयाची झाल्यास मानवी मनाला सहजपणे नकळत ज्या भावना, संवेदना, जाणीवा

अनेक व्यवहारात, उद्योगात, जीवनात प्राप्त होतात त्यांचे लेबल 'अनुभूती' ह्या शब्दाने भाषेच्या माध्यमातून जाणले जाते. कमळाच्या वा गुलाबाच्या सौंदर्याची 'अनुभूती' घेणे, उसाच्या रसाची 'गोडी' अनुभवणे वगैरे आपल्या अनुभवाची साठवण व स्मृती होत असते. ती पुष्कळी काळ गेल्यावरही केवळ स्मृतीने मनात व अंतकरणात जागृत करुन तोच अनुभव परत चवीने, रुचीने, आनंदाने घेण्याचे प्रयत्न आपण केलेले असतात.

पण ते कसे होतात व त्याचे शास्त्र कोणते, हे आपण जाणत नाही. पण ही 'अनुभूती' घेण्याची क्षमता फार महत्वाचे असे साधन आहे. ह्याच अनुभूतीशास्त्रातील क्रियेला योगशास्त्रात अत्यंत महत्वाचे स्थान आहे, हे कदाचित आपल्याला माहीत नसेल.

पण, संप्रज्ञात, असंप्रज्ञात समाधिच्या सिद्धीसाठी धारणा, ध्यान ही 'अंतरंग साधनेची' महत्वाची अंगे वा भाग एका गूढ यंत्रणेचीच अवजारे आहेत, हे लक्षात घ्या!

**योगशास्त्राचा आधार**

पातंजल योगशास्त्रातील वचन आहे

**देशवंध चित्तस्य धारणा ।।१।। विभूतिपाद**

ज्यावेळेस योगातील 'यम, नियम, आसन, प्राणायाम आणि प्रत्याहार हे 'सिद्ध' होतात. तेव्हा चित्ताला 'धारणा' हे सहावे अंग प्राप्त होते. मनाची स्वाभाविक चंचलता इथे नष्ट होते.

मग, शरीराच्या अंतरंगातील 'देशविशेष' म्हणजे हृदयकमळ, मुर्धा ज्योति, नासिका अग्र, जिव्हाअग्र वगैरे भागावर चित्ताची एकाग्रता करणे साधते, ह्यालाच 'धारणा' म्हणले जाते. ह्या धारणे नंतर ज्या ध्येय विषयाला आलंबन केलेले ज्ञान रुपावर ध्यान चालू राहिल्यानंतर त्याचे ज्ञान प्राप्त होते. अर्थातच ह्या आलंबनाचा विषय असलेले ध्येयरुप ज्ञान त्या विषयाबद्दल प्रथम सत्य शब्दज्ञान प्राप्त झाल्यावरच धारणा, ध्यान ह्यांच्या सदृश प्रवाहानंतर 'संयम' या संकल्पनेपर्यंत साधक पोचतो. ह्या संयमानंतर धारणा ध्यान व ध्येय-त्या विषयांची त्रिपुटी एकात्म होऊन समाधि स्थिती प्राप्त होते. ह्या अंतर्गत क्रियेच्या यशस्वी साधनेने जी भावना व ज्ञान प्राप्त होते त्याला 'अनुभूती' असे म्हणता येईल.

सर्वसाधारण माणसाला 'अनुभूती'चे हे शास्त्रशुद्ध ज्ञान नसल्याने त्याला कदाचित असा भ्रम पैदा होऊ शकेल कीं ह्या एव्हढ्या क्लिष्ट टप्प्यांची माहीती व प्राप्ती भेद वृत्तिने होण्याची काय आवश्यकता आहे. पण, हे इतके साधे सोपे नाही. पूर्व जन्मीच्या पुण्याईने वा कर्माशयाच्या संचयाने जरी काही साधू संतांना ह्या क्रिया वरवर पहाता सहजपणे भक्ति व श्रद्धेच्या योगाने प्राप्त झाल्या असल्या तरी सामान्य साधकाला पूर्वपुण्याई नसतानाही ह्या प्रयत्नसाध्य भेद जाणीवेच्या पायरी पायरीच्या ज्ञानावर आधारुन, ही 'संयम' क्रिया साध्य होऊ शकते असा विश्वास आहे. सुरुवातीला जरी पुष्कळ धडपड व प्रयत्न करावे लागले तरी सतत व निरंतर साधनेने ही 'संयम' क्रिया साधकाला सिद्ध होऊ शकते.

हा अभ्यास पुढे नेण्यासाठी आपण ह्या विलक्षण 'अनुभूतीशास्त्राचा' यशस्वी उपयोग 'भारतीय संस्कृतीतील' ऋषी, मुनी, संत, ब्रह्मज्ञानी, महायोगी यांनी घेतला व त्या 'अनुभूतींना' शब्दसृष्टीचा आधार दिला, ते पुढच्या अंकांतून पाहू या.

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल -९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

मैत्रीचा झरा वाहता झाला की त्याची करुणा होते.

# परिसर वार्ता

– संकलित

## सौ. ए. के. जोशी, पूर्व प्राथमिक विभाग

**प्रथम सत्राचा आढावा**

जून २०१२ नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले म्हणता म्हणता पहिले सत्र संपलेही. या सत्रातील विविध उपक्रमांची थोडक्यात माहिती या लेखातून आपण घेणार आहोत.

**नागपंचमी (सोमवार, २३ जुलै)**

शिक्षकांनी एका लहान ट्रेमध्ये शेत तयार केले होते. त्यात नागाची प्रतिमा ठेवून ती पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्य दरवाज्याजवळ ठेवण्यात आली. एका वर्गात नागाची प्रतिमा ठेवून प्रत्येक शिक्षिकेने आपल्या वर्गातील मुलांसोबत त्याचे पूजन केले. आपण नागाची पूजा का करायची, तो शेतकऱ्याचा मित्र कसा आहे याची माहिती मुलांना दिली. सिनीयर के. जी.च्या मुलांनी चिकण मातीपासून नाग तयार केले. नागांची माहिती देणारी चित्रफीत मुलांना दाखवण्यात आली. कागदापासून सोप्या पद्धतीने साप करायला मुलांना शिकवण्यात आले. लाह्या, बत्तासे असा पौष्टिक खाऊ प्रसाद म्हणून देण्यात आला.

**१५ ऑगस्ट**

या अनुषंगाने मुलांना तिरंग्याची गाणी शिकवण्यात आली. सिनियरच्या मुलांनी तिरंगा रंगवला तर ज्यूनियरच्या मुलांना शिक्षकांनी तिरंगा त्यांच्या गणवेशावर लावून दिला. अभिमानाने झेंडा आपल्या छातीवर मिरवत मुलांनी ध्वजगीते गायली. सिनीयरच्या मुलांनी कवायती केल्या व गाणी गायली.

**रक्षाबंधन (बुधवार १ ऑगस्ट)**

सिनीयर के. जी.च्या मुलांनी ८ दिवस आधीपासून शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली राख्या बनवल्या. मुले नटूनथटून आली होती. सगळ्या मुलांनी एकमेकांना राख्या बांधल्या. नारळ वडीचा गोड खाऊ मुलांना दिला गेला.

**दहिहंडी**

गुरुवार ९ ऑगस्ट रोजी आम्ही दहिहंडी साजरी केली. एकावर एक थर कसे रचायचे; हंडी कशी फोडायची याचे प्रात्यक्षिक मुलांना दिले गेले. कृष्णजन्माचा छानसा देखावा मांडला होता. सर्व मुलं साध्या वेशात आली. दहिहंडीसंबंधी गाण्यांची कॅसेट लावून, मुलांना 'गोविंदा रे गोपाळा' लिहिलेल्या पट्ट्या बांधल्या. हंडीमध्ये विडा, पान, सुपारी घातली. फुले व रंगीत पट्ट्यांनी हंडी सजवली. दोन्ही विभागांतील काही मुलं कृष्ण बनून आली होती. एकावर एक थर लावून शिक्षकांच्या मदतीने बालगोपाळांची हंडी फोडली गेली. दही, काकडी, पोहे, दूध, साखर घातलेला दहिकाला मुलांना प्रसाद म्हणून दिला गेला.

**गणपती**

सर्वांचे लाडकं आराध्य दैवत म्हणजे गणपती. लहान मुलांचा गणपती बाप्पा. यावर्षी १७ ऑगस्टला शाळेत गणपती उत्सव साजरा झाला. दोन्ही विभागांतील सर्व मुले शिक्षकांसमवेत मूर्ती आणायला गेली होती. गणपतीची पूजा तसेच आरती झाली. मुलांना गणपतीचे श्लोक व गाणी शिकवली होती. ती त्यांनी म्हटली. गणपतीची विविध रूपे आगमनापासून विर्सजनापर्यंतचे सगळे उपचार त्याचे महत्व असलेली चित्रे, तक्ते वर्गातून व व्हऱ्यांड्यात लावण्यात आली होती. त्याच दिवशी बाप्पांची विसर्जन आरती व बादलीत विसर्जन करण्यात आले. तलावात किंवा सार्वजनिक जागी विसर्जन करण्याचे तोटे मुलांना समजावून सांगितले. नारळ बर्फीचा प्रसाद मुलांना दिला.

ज्यूनियरच्या मुलांनी चिकणमातीपासून लाडू, मोदक, उंदीर करण्याचा छान प्रयत्न केला, तर सिनीयरच्या मुलांनी चिमुकले पण सुबक गणपती तयार केले. गणेश उत्सवाच्या काळातच मुलांनी या संबंधीची चित्रेही काढली.

**दसरा, भोंडला**

नवरात्र दसरा या दरम्यान महाराष्ट्रात खेळला जाणारा भोंडला देवीचे श्लोक व गाणी मुलांना शिकवली. तसेच दोन्ही विभागाच्या प्रत्येक गटाला एक अशी भोंडल्याची गाणी त्यावर साधे सोपे नृत्य शिकवण्यात आले. देवीची विविध रुपे दर्शवणारे तक्ते लावले होते. नवरात्रात रोज वेगळा रंग परिधान केला जातो. रोज त्या रंगाच्या ओढण्यांनी सजावट केली गेली. मंगळवार, २३ ऑक्टोबरला शाळेत भोंडला खेळला गेला. रंगीबेरंगी पारंपारिक वेशभूषा केलेली मुलं फेर धरून सजवलेल्या हत्तीभोवती भोंडला खेळली. यापैकी एका गाण्यात काही मुलांची नावे गुंफण्यात आली होती; नंतर शिक्षकांची नावे सुद्धा त्यात घेतली. जी मुलांना फारच आवडली. राजगिरा लाडूचा प्रसाद मुलांना वाटण्यात आला.

**दिवाळी**

सर्व जणांचा राजा असा हा दिवाळीचा सण. दिवाळीच्या संबंधीची चित्रे, तक्ते यांनी व्हरांडा खुलुन गेला होता. सर्व वर्गांतून दिवाळी संबंधातील चित्रे सुखाची आनंदाची खूण करत होते. शिक्षकांनी मातीचा किल्ला व पारंपारिक रांगोळीने प्रवेशद्वार सुशोभित केले होते. कागदापासून बनवलेल्या फटाक्यांच्या प्रतिकृती सर्वांना चकित करीत होत्या. ९ नोव्हेंबरला फुलांनी पणत्यांनी, रांगोळ्यांनी पूर्ण मजला उजळून निघाला होता. नवीन कपडे घालून मुलं शाळेत आली. मुलांबरोबर शिक्षकांनी दिवाळीची गाणी म्हटली. प्रदूषणविरहीत फटाके सुद्धा लावले.

सिनीयरच्या मुलांनी वेगवेगळ्या प्रकारच्या दिव्यांची, आकाश कंदिलाची चित्रे रंगवण्यास दिली. दिव्यांची चित्रे सर्व वर्गातून तोरण म्हणून लावली तर आकाश कंदिल मुलांना घरी देण्यात आले.

विविध उपक्रमांची रेलचेल असलेलं हे पहिलं सत्र संपलं आता वार्षिक स्नेहसंमेलनाची, सहलीची रेलचेल असलेल्या दुसऱ्या सत्राची आपण सगळेच वाट बघतोय हो ना!

– सौ. प्रिती कुळकर्णी

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

जोशी–बेडेकर महाविद्यालयात कम्युनिटी कॉलेजची स्थापना

कम्युनिटी कॉलेज, व्यावसायिक प्रशिक्षण व नोकरीची सुवर्ण संधी

शैक्षणिक वर्ष २०१२–२०१३ पासून मुंबई विद्यापीठाने हिंदुस्तान कोका–कोला बेवरेजेय् या नामांकीत बहुराष्ट्रीय कंपनीच्या संयुक्त विद्यामाने 'कम्युनिटी कॉलेज' हि नाविन्यपूर्ण योजना सुरू केली आहे. या योजनेची घोषणा व उद्घाटन दिनांक ३० ऑक्टोबर २०१२ रोजी, महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, माननीय राजेश टोपे व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजन वेलूकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळ प्रणीत ए. के. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालयास मुंबई विद्यापीठाचे 'कम्युनिटी कॉलेज' सुरू करण्याचा बहुमान मिळाला आहे.

विद्यार्थ्यांना व्यावसायाभिमुख/व्यावसायिक प्रशिक्षण देऊन नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देणे हे कम्युनिटी कॉलेजचे प्रमुख उद्दीष्ट आहे.

**कम्युनिटी कॉलेजची ठळक वैशिष्टये :–**

- अभ्यासक्रमाचे ८०% शुल्क कोका–कोला कंपनीतर्फे भरण्यात येईल.

- विद्यार्थ्यांना नोकरी मिळण्यास उपयुक्त प्रशिक्षण देणे.
- नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देण्यास मदत करणे.
- एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास 'सर्टिफिकेट' देण्यात येईल.
- दोन वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास 'असोसिएट डिग्री' प्रदान करण्यात येईल.
- प्रवेश घेण्याची कमीत कमी शैक्षणिक अर्हता कुठल्याही शाखेतून १२ वी उत्तीर्ण.
- दोन वर्षाची 'असोसिएट डिग्री' पूर्ण केल्यानंतर मुंबई विद्यापीठाच्या कला, वाणिज्य वा विज्ञान शाखेच्या तृतीय वर्षात प्रवेश घेऊ शकता.

या शैक्षणिक वर्षाचे प्रवेश जोशी-बेडेकर महाविद्यालयात सुरु आहेत.

**विस्तृत माहितीसाठी खालील व्यक्तींशी संपर्क साधू शकता,**

प्राध्यापक : सुभाष ग. शिंदे - ९८२०३२८२२६
प्राध्यापक : स्मिता भिडे - ९३२२९४८४८५
प्राध्यापक : नारायण बारसे - ९९६९०५१२८७
e-mail (गणपत्र) : nbarse@gmail.com
joshibedekar@gmail.com
Website (संकेतस्थळ) : www.vpmthane.org

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे यांच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाने गगनचुंबी भरारी घेतली आहे. भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान या विभागाकडून बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयास ९७ लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. हे अनुदान महाविद्यालयाच्या शैक्षणिक सुविधा वाढवणे, संशोधन प्रयोग शाळांमध्ये सुधारणा करणे व उच्च प्रतीच्या संशोधनाचा पाया बळकट करणे यासाठी दिले जाते.

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय हे मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत एकमेव विज्ञान महाविद्यालय आहे. या महाविद्यालयात एकूण १२ विषय शिकविले जातात. त्यातील ४ विषयांमध्ये म्हणजे रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, पर्यावरणशास्त्र व माहिती आणि तंत्रज्ञान या विषयांमध्ये पदव्युत्तर शिक्षणाची तर ४ विषयांमध्ये म्हणजे रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, वनस्पतीशास्त्र व प्राणीशास्त्र या विषयांमध्ये संशोधनाची व पी.एच.डी.चीही सोय आहे. महाविद्यालयातील १३ शिक्षकांना संशोधनाकरिता मार्गदर्शक म्हणून विद्यापीठाची मान्यता आहे. महाविद्यालयातुन ५९ विद्यार्थ्यांनी पी.एच.डी. ही पदवी प्राप्त केली आहे. तर गेल्या ५ वर्षात १५० शोधनिबंध सादर केले आहेत.

ठाण्यातील नावाजलेले हे महाविद्यालय आता ४३ वर्षांचे झाले आहे. या महाविद्यालयास बंगलोरमधील नॅक या संस्थेने २०१० मध्ये 'अ' दर्जाचे मानांकन दिले व मुंबई विद्यापीठाने २०११मध्ये उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून गौरविले आहे. आतापर्यंत हजारो विद्यार्थी शिकून पुढे उत्तम दर्जाचे डॉक्टर व इंजिनिअर झाले आहेत व आपापल्या क्षेत्रात उत्तम कार्य करत आहेत. त्याप्रमाणे संशोधन व शिक्षण क्षेत्रातही खूप विद्यार्थी कार्यरत आहेत. अतिशय उत्तम दर्जाच्या सोयीसुविधा, प्रयोगशाळा, प्रयोगशाळेत लागणारी आधुनिक उपकरणे, इंटरनेटवरुन ग्रंथ व संशोधन विषयक साहित्य उपलब्ध करुन देणारे दर्जेदार ग्रंथालय या सर्वांचा विचार करुन भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागातर्फे सदर ९७ लाखांचे अनुदान मंजूर झाले आहे.

महाविद्यालयाच्या या यशामध्ये विद्या प्रसारक मंडळाची दूरदृष्टी व प्रोत्साहन याचा सिंहाचा वाटा आहे. याचबरोबर प्राचार्या डॉ. (सौ.) माधुरी पेजावर, उप प्राचार्य प्रा. बुरकुले, शिक्षक, शिक्षकेतर सहकारी, आजी व माजी विद्यार्थी या सर्वांच्या अथ परिश्रमामुळे हे यश प्राप्त झाले आहे. महाविद्यालयाच्या जडणघडणीत मुंबई

विद्यापीठाबरोबरच सर्व ठाणेकरांसह अनेक संस्थाचे तसेच विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व संस्थांचे सहकार्य व प्रोत्साहन सतत लाभलेले असल्याने या सर्वांचे महाविद्यालय ऋणी आहे.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### विद्यापीठ परिक्षा (२७ नोव्हेंबर – १३ डिसेंबर)

अ) e - मार्ग (E - way)

ह्या वर्षी विद्यापीठातर्फे प्रश्नपत्रिका संगणकीय माध्यमा मार्फत पाठविण्यात आल्या. महाविद्यालयातर्फे प्रश्नपत्रिका पाहणे, मुद्रित करणे व आवश्यक्यतेनुसार प्रती काढणे. ह्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांची उपलब्धता करण्यात आली. ह्या कार्यात विद्या प्रसारक मंडळातर्फे मिळालेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

विद्यापीठातर्फे प्रश्नपत्रिकांच्या संगणकीय मार्गामार्फत उपलब्धतेचा अभिरूप सराव दि. २२ व २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता घेण्यात आला. विद्यापीठातर्फे प्रो. प्रकाश मोकल (गव्हर्नमेंट विधी महाविद्यालय, चर्चगेट) ह्यांची जॉइन्ट चीफ कंडक्टर त्याचबरोबर प्रभारी प्राचार्या यांची चीफ कंडक्टर म्हणून परीक्षेवर नियुक्ती करण्यात आली.

ब) प्रवेशपत्र दुरुस्ती (Hall Ticket correction)

विद्यापीठातर्फे महाविद्यालयातील प्राचार्यांना प्रवेशपत्रिकेत असलेल्या चुका दुरुस्त करणे व त्या संदर्भात विद्यापीठाला कळविणे ही जबाबदारी सोपविण्यात आली होती.

– विधी महाविद्यालय– संकलन
**शितल औतडे**

## *विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर*



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर जय मिळवता यावा,
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी,
माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी,
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये,
एवढीच माझी इच्छा.

**गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर**

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आत्मनिग्रह म्हणजे स्वयं निर्धार.

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे**. त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

(पृष्ठ ..... २ वरून – **संपादकीय)**

पोरका झालेला असतो. स्वातंत्र्यानंतरच्या राजकीय पुढाऱ्यांनी गांधी, नेहरू, फुले, आंबेडकर यांचे केलेले दैवतीकरण हे चिकित्सक **बुद्धिवादाकडे पाठ** तर सोडूनच द्या, पण आजचे त्याचे स्वरूप हे **दांभिक, लाचार** आणि **विवेकशून्यतेची** परिसीमा गाठणारे आहे. नाटकात जशी नांदी असते तसे स्मशानात केलेल्या भाषणांमधूनही अशा दैवतांच्या नावांचा उच्चार अपरिहार्य बनू लागला. याचीच पुढची पायरी म्हणजे असहिष्णुता आणि धटिंगणशाही. ज्या गांधी नेहरूंची शिकवण अहिंसा आणि सहिष्णुता असल्याचे सांगितले जाते, त्यांच्या अनुयायांकडून मात्र या नेत्यांचा विचार आणि धोरणांची वस्तुनिष्ठ चिकित्सा सहन केली जात नाही. या गोष्टी येथेच न थांबता अशा चिकित्सकाला मूर्ख, मागासलेला आणि देशद्रोही समजण्यात येते. त्याही पलीकडचा कडेलोट म्हणजे नाटक, सिनेमा, कला, उच्चार स्वातंत्र्याचा पाठपुरावा करणारे विचारवंत गांधी, नेहरू, शिवाजी, आंबेडकर, फुले यांच्या विचारांशी असहमती दर्शवलेल्या लिखाणाच्या बाबतीत मात्र कमालीचे हळवे झालेले दिसतात.

दैवत्व मिळवलेल्या नेत्याच्या कुटुंबालाही लौकरच **बुद्धी** आणि **नेतृत्वाचे विशेष** अधिकार प्राप्त होतात. अशी कुटुंबे आणि अनुयायी यांच्यामध्ये **एकमेका सहाय्य करु, उद्धार करु** असे नाते निर्माण होते. अनुयायीही 'मालामाल' होतात. राजेशाही, सरंजामशाही, घराणेशाही यांचा घसा फुटेस्तोवर विरोध करणाऱ्या सिद्धांतवाद्यांनाही अशा कुटुंबामध्ये समाजवादी, निधर्मी आणि लोकशाहीचे अंकूर दिसू लागतात. स्वकर्तृत्वावर शिपायाची नोकरीही मिळण्याची क्षमता नसलेले हे कुटुंबीय, नुसतेच धनवान नाही तर अनुयायांकरवी त्यांचेही देव्हारे बांधण्यात मग्न झालेले असतात.

दैवतीकरण हे अनुयायांच्या राजकारणातील यशाकरता जेव्हा **जादूचा** ताईत ठरू लागते तेव्हा तर असे दैवतीकरण किळसवाणे स्वरूप धारण करते. तामिळनाडूपासून उत्तरप्रदेश, बिहारपर्यंत गेल्या एक दोन दशकांतील राजकीय नेतृत्वाचे दैवतीकरण याच साचातले आहे. पुतळे, स्मारके, रस्त्यांपासून सार्वजनिक संस्थांना अशा दैवतांची दिलेली नावे आणि त्यासाठीचा आग्रह उबग आणणारा आहे. पुतळे किंवा स्मारके कमी पडू लागतात म्हणून की काय, आता रस्ते आणि इतरत्र लावलेले वाढदिवसांपासून जयंत्या, पुण्यतिथ्यांचे फलक, सार्वजनिक जागाही विद्रूप करत आहेत.

गंभीर किंवा क्रांतिकारक विचार मांडणे हे कल्पकता आणि साहित्यावरील प्रभुत्वातून निर्माण होऊ शकते, पण **बोले तैसा चाले** आणि **चारित्र्यसंपन्न** अनुयायी निर्माण करणे मात्र सहस्रकातील एखाद्याच नेत्याला जमते. चांगल्या नेतृत्वाला प्रसिद्धी लागत नसते; पण सिनेमा चालवायला किंवा एखादी वस्तू विकायला मात्र प्रचंड प्रसिद्धी करावी लागते. व्यापारातील यशाचे हे गमक आजचे नेतृत्व आणि त्यांच्या अनुयायांनी पक्के ओळखले आहे. आजच्या प्रसिद्धी माध्यमांनाही काहीतरी नवीन हवे असते आणि म्हणूनच नावीन्याचा शोध लावून प्रसिद्धी माध्यमे असल्या दैवतीकरणाला प्रोत्साहनच देत असतात.

सत्य हे वास्तवापेक्षा भयानक असते. आजचा भयानक भ्रष्टाचार हे मूल्यहीन, चारित्र्यहीन समाजाचे अपत्य आहे. राजकारणाचे गुन्हेगारीकरण हे त्याच अपत्याला झालेले पुढचं मूल आहे. साहजिकच या सर्वांचे **कूळ** वैचारिक दांभिकता हे आहे. **यथा प्रजा तथा राजा** हे जेवढे सत्य आहे तेवढेच **यथा राजा तथा प्रजा** हेही सत्य आहे. अफूची नशा ही अफूचे प्रमाण वाढवत नेऊन मिळवावी लागते. आजच्या दैवतीकरणाचा प्रवास हा आता महात्मा, महर्षी, महामानवापासून जननायकापर्यंत येऊन पोहोचला आहे. प्रत्यक्षात मात्र सत्य, आत्मसन्मान आणि विवेक यांची निष्क्रिय स्मारके होऊन राहिली आहेत. दैवतांची हीच खरी शोकान्तिका आहे.

**– डॉ. विजय बेडेकर,**
माननीय संपादक, दिशा

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.